INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY
LIBRARY

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

## आशियातील शेजारी राष्ट्रे : दिवाळी विशेषांक


१ संपादकीय (आशिया)
७ म्यानमार
११ थायलंड
१५ व्हिएटनाम
१९ मलेशिया
२२ सिंगापूर
२६ इंडोनेशिया
२९ ईस्ट तिमोर
◆ ३२ फिलिपीन्स
◆ ३६ चीन व हाँगकाँग
◆ ४१ जपान
◆ ४४ मंगोलिया
◆ ४७ पाकिस्तान
◆ ५१ नेपाळ
◆ ५४ जगाच्या पाठीवर..(नूडल्स)
५९ कालप्रवाहात......


खंड २ : अंक ७ व ८ ऑक्टोबर-नोव्हेंबर २००३

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## ‘अर्थबोधपत्रिके’तील माहिती कशी ?
## जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे ‘अर्थबोधपत्रिका’ हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे. ◆अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली 'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठविणे अत्यावश्यक आहे. ◆अंक मिळविण्यासाठी वार्षिक वर्गणी १००रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $२०) डिमांड ड्राफ्ट / मनीऑर्डर / पोस्टल ऑर्डर / चेकने किंवा रोख 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' या नावे पाठवावी. त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.

**अर्थबोधपत्रिका : खंड २ (जोडअंक ७ व ८) : ऑक्टोबर-नोव्हेंबर २००३**
**संपादक** - रमेश पानसे, **संपादन साहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर
**पत्रव्यवहारासाठी पत्ता** : संपादक / व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**, अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.

**फोन : ५६५७१३२** **ई-मेल : ispe@vsnl.com**
**: ५६५७२१०** **फॅक्स : ५६५७६९७**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# संपादकीय

'अर्थबोधपत्रिके'चा ऑक्टोबर नि नोव्हेंबर (२००३) असा हा जोडअंक आहे. याचे स्वरूप वार्षिक विशेषांकाचे आहे. भारताच्या शेजारी राष्ट्रांतील सामाजिक (आर्थिक -राजकीय) स्थिती हा विषय डोळ्यासमोर ठेवून या अंकाची आखणी करण्यात आली. अर्थात, भारताच्या पश्चिमेला, वायव्येला, ईशान्येला, पूर्वेला आणि उत्तर-दक्षिणेलाही अनेक देश आहेत. एकाच छोट्याशा अंकात या सर्वच देशांविषयी, देशांमधील समाजाविषयी, माहिती देणे शक्य होणार नाही, ही मर्यादा आधीपासूनच गृहीत धरलेली होती. त्यामुळे काही निवडक देशांचा समावेश या अंकात केला आहे. दुसरी मर्यादा अशी की, कोणत्याही देशाविषयी सर्वांगीण लिहिणे शक्य नव्हते, त्यामुळे तीन -चार पानांत जेवढी स्थूल ओळख देता येईल, तेवढी येथे दिली आहे. त्यातही थोडासा इतिहास, थोडीशी राजकीय परिस्थिती आणि आर्थिक प्रश्न यांना जागा दिली म्हणून, अंतर्भूत केलेल्या देशांच्या संदर्भात एखाद-दुसऱ्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता, त्यामुळे तसाच प्रयत्न ठेवला आहे.

तिसरी गोष्ट अशी की, विविध देशांमधील एकाच समान प्रश्नाचा विचार केलेला नाही, तर त्या त्या देशांच्या संदर्भात, उपलब्ध झालेल्या माहितीतील एक दोन बाबींवरच प्रत्येक लेख बेतण्यात आला आहे. ही सर्व माहिती प्रामुख्याने इंटरनेटवरून घेतली आहे. विविध देशांमधील अतिशय तज्ज्ञ अभ्यासकांचे, संशोधकांचे, प्राध्यापकांचे आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध होणारे लेख, अनेक पुस्तके आणि आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त नियतकालिके यांच्यामधून ही माहिती मिळविण्यात आली आहे. ही माहिती खूप वैविध्यपूर्ण व रंजक आहे, पण अंकाची मर्यादा लक्षात घेता, शेजारी देशांकडे जरा अधिक जाणतेपणाने वाचकांचे लक्ष जावे आणि त्यासाठी या देशांची थोडीशी प्राथमिक स्वरूपाची तरी ओळख व्हावी एवढाच मर्यादित हेतू समोर ठेवला आहे.

भारताच्या शेजारी देशांपैकी काहींची केवळ ओळख करून देण्याच्या निमित्ताने जेव्हा उपलब्ध वाङ्मयाचा आढावा घ्यायला सुरुवात केली, तेव्हा असे लक्षात आले की, प्रत्येक देशाविषयी थोडेफार स्वतंत्रपणे लिहिणे वेगळे आणि एकत्रितरीत्या दक्षिण आशिया किंवा आग्नेय आशियाविषयी लिहिणे वेगळे. अर्थबोधपत्रिकेच्या मर्यादित

*(पान ३ वर पाहावे.)*

# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'च्या सप्टेंबर २००३ च्या अंकातील 'तेलाचा व्यापार.....' या लेखावरून तेलसमृद्ध देशात गरिबी आणि भ्रष्टाचार वाढतो हे कळले. शिवाय तिथे कुपोषण वाढते व आयुष्यमान कमी होते हेही आश्चर्यकारक निरीक्षण कळले. पण गरिबी, कुपोषण का वाढले, याचा उलगडा झाला नाही. त्यासाठी केवळ भ्रष्टाचार हेच कारण नसावे. आणखीही कारणे असतील त्याचा खुलासा आवश्यक होता. होतो का पाहावा. पत्रिकेतील लेख खूपच वाचनीय असतात. जगाचे व्यवहार अर्थकारणाशी निगडित असतात. त्याच्या परस्पर संबंधांसह आपण तो प्रसिद्ध करता ही बाब विशेष जाणवते.

दिगंबर गाडगीळ, नाशिक

सप्टेंबर २००३ चा अंक मला तरी समाधानकारक वाटला नाही. मी स्वतः अनेक ठिकाणी लिहित असतो. एकाने अशी टीका केली की माझे लिहिणे constuctive नसते. मी उत्तर दिले की काहीही नवीन मांडण्याआधी वास्तवाची चांगली जाण हवी. ती जाण करून देणे याला मी constuctive लिखाणच म्हणतो. त्या भूमिकेतून हे पत्र लिहित आहे. या अंकातील फक्त पाणी व्यवस्थापनावरील लेख वास्तवाची, म्हणजे पाण्याच्या मूलभूत कमतरतेची जाणीव करून देणारा आहे. बाकी परिस्थिती पुढीलप्रमाणे: जिथे जिथे तेलाचा शोध लागतो तिथे तिथे गरिबी व निरक्षरता वाढते हे विधान कोंबडा आरवला की सूर्य उगवतो या विधानासारखे आहे. साहचर्य असेल पण कार्य-कारण संबंध नक्कीच नाही. भ्रष्टाचारामुळे हे घडते असे स्पष्टपणे म्हटलेले नाही. तसे म्हटले तर तेलाचा शोध हे कारण राहात नाही. भ्रष्टाचार अनेक क्षेत्रात आहे.अमेरिकेने भ्रष्टाचाराने निर्यात वाढविण्याविरूद्ध जो कायदा केला तो तेलाच्या व्यापाराच्या संदर्भात नव्हता. लॉकहीड या विमान-उत्पादक कंपनीने अवलंबिलेल्या भ्रष्ट मार्गाविरुद्ध होता. याच लेखात आणखीही दोन मुद्दे आहेत ज्यांचा गरिबीशी आणि निरक्षरतेशी काही संबंध जोडून दाखविलेला नाही. ते मुद्दे म्हणजे खाजगीकरण व पर्यावरण. 'कट अँड पेस्ट' या पद्धतीचा हा लेख दिसतो. अशा लेखात सुसूत्रता येणे कठीणच. अर्थशास्त्रातील नवसनातनवादी विचारांना नवविचारांनी लगेच खिंडार पडणार नाही, हे विधान वास्तवाची थोडीशी जाण करून देणारे आहे पण नवसनातनवाद स्वतः मानवी व्यवहाराच्या निरीक्षणावरच आधारलेला आहे, तो पाया बळकट आहे.

*(पान ५० वर पाहावे.)*

(पान १ वरून )
आवाक्यात दोन्हीही गोष्टींचा समावेश होऊ शकणार नव्हता. त्यामुळे असा विचार केला की, प्रत्येक देशाची ओळख हीसुद्धा आपली प्राथमिक गरज आहे; आणि सध्या तरी त्यावरच लक्ष केंद्रित करावे; मग असाही विचार सुचला की, दिलेल्या ओळखीच्या आधारे तसेच त्यासाठी वाचलेल्या वाङ्मयाच्या आधारे, या प्रदेशाविषयी एकत्रितरीत्या काही सांगता येईल काय, ते पाहावे; आणि त्यासाठी एखादा संपादकीय लेखच वाचकांपुढे ठेवावा.

भारताच्या शेजारी देशांबाबत कोणताही एकच विषय मध्यवर्ती ठेवून त्यांची ओळख येथे करून दिलेली नसल्यामुळे, विविध विषयांचे दिसून येणारे धागे असेच स्वरूप येथे अभिप्रेत आहे. शक्यता अशी आहे की, पुढील वर्षभरात, एकेका देशावर लक्ष केंद्रित करून त्या देशाची जरा सविस्तर (आणि येथे फारसे स्थान न मिळालेली अशी ओळख करून द्यावी. )

भारताच्या शेजारील काही देशांच्या या स्थूल ओळखीमधूनही काही ऐतिहासिक, भौगोलिक नि आर्थिक समानता, वाचकांच्या सहजच लक्षात येतील. उदाहरणार्थ, येथील बहुतेक देशांना साम्राज्यवादी पारतंत्र्याची पार्श्वभूमी आहे. गेल्या सुमारे अर्धशतकात ते स्वतंत्र होऊन विकासाकडे मार्गक्रमण करीत आहेत, आणि एखादा जपानसारखा अपवाद सोडला तर बहुतेक देश विकसनशील गटांच्या देशात मोडतात. भारत किंवा थायलंडचा अपवाद वगळता, राजकीय अस्थिरता आणि त्यातून निर्माण होणारी सामाजिक अस्वस्थता - असेच वातावरण अनेक देशांमधून, गेल्या अर्धशतकात राहिलेले आहे. गरिबीचे नि बेकारीचे प्रश्नही अगदी सामान्य प्रश्न आहेत. गेल्या दशकातील जागतिकीकरणाने या मूलभूत प्रश्नांवर तोडगे उपलब्ध करून दिलेले नाहीत. बहुतेक देशांमधून अनेक धर्मांचे नि वंशांचे लोक अनेक शतके एकत्र नांदताहेत. परंतु धार्मिक किंवा वांशिक भेद, अस्वस्थता, दंगली, हत्या यांचे लोण अलीकडे पसरतच चालले आहे. धार्मिक (वांशिक) कडवेपणा नि कटुता, अविवेक नि हिंसा यांनी आशियातील देशांचे वातावरण गढूळ होत चालले आहे आणि राजकारणांचे वारे समाजाला त्याच दिशेने भरकटत नेत आहे.

या प्रदेशांकडे, त्याच्या आजच्या सामाजिक परिस्थितीचे विहंगावलोकन केले तरी दोन-तीन बाबी ठळकपणे नजरेत भरतात. विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकाच्या सुरुवातीला, या प्रदेशात एक प्रकारची आर्थिक सुबत्ता, संपन्नता दिसून येत

होती; आर्थिक क्षेत्रातून उत्साहाचे वातावरण पसरले होते; त्या दशकाच्या अखेरीस मात्र हा उत्साह ओसरला होता. आर्थिकदृष्ट्या अनुभव भ्रमनिरासाचा होता. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, यांवरची उपाययोजना नजरेसमोर येत नव्हती. एक प्रकारचे आर्थिक आरिष्ट आले; पण, त्याला कसे तोंड द्यावे याविषयी मात्र संभ्रमाची स्थिती. या दशकाच्या अखेरीस जागतिकीकरणाची प्रक्रिया स्थिरावत चालली आहे; आणि स्वतंत्र राष्ट्रांपुढील तेच मोठे आव्हान आहे. कदाचित विसाव्या शतकातील राष्ट्रवादाला त्याने पुनश्चः उठाव येईल किंवा शक्यता अशीही आहे की राष्ट्रांतर्गत धार्मिक, वांशिक अशा गटांचे स्वत्व उफाळून येईल.

ऐतिहासिकदृष्ट्या पाहिले असता, या सर्व देशांमधून मिश्रसंस्कृती कित्येक शतके वास करून आहेत. भिन्न भिन्न धर्मीयांच्या, वंशियांच्या परस्परसंबंधातून अशी परिस्थिती निर्माण झालेली असली तरीही त्यांची एकत्रित अशी, ज्याला आपण 'आशियाई ओळख' म्हणू शकू, अशी ओळख अस्तित्वात आलेली नाही. अलीकडच्या म्हणजे १८ व्या, १९ व्या नि विसाव्या शतकातील पाश्चात्य वसाहतवादाने आपले हातपाय या प्रदेशांत पसरले. मात्र गेल्या अर्धशतकात, या सर्व राष्ट्रांनी वसाहतवादाच्या तावडीतून आपली सुटका करून घेऊन स्वतंत्र देशांच्या नामावलीत स्थान प्राप्त करून घेतलेले आहे. तरीही, समान परिस्थितीतून जवळपास एकाच वेळी बाहेर पडलेल्या या देशांची 'आशियाई संस्कृती' म्हणून ओळख पुढे आलेली नाही. सॅम्युअल हंटिंग्टन यांनाही आजच्या संस्कृतींच्या झगड्यांविषयी भाष्य करताना ( 'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स') 'आशियाई संस्कृती' अशी काही गोष्ट ठळकपणे जाणवलेली नाही. उलट, आशियातील विविध संस्कृतींमधील भेद मात्र जाणवले आहेत. अशी स्वतंत्र 'आशियाई ओळख' जाणवत नसली तरी ती निर्माण करण्याची गरज मात्र, ऑक्टोबर १९८७ ला दिल्लीत भरलेल्या 'एशियन रिलेशन्स कॉन्फरन्स'ला जाणवली होती. गेल्या सुमारे अर्धशतकात आशिया खंड विविध समस्यांच्या तावडीत सापडलेला आहे. देशादेशांमधील सीमा प्रश्न आणि परस्पर राजकीय संबंध; देशांतर्गत भ्रष्टाचार आणि अलीकडचे दहशतवादी कारवायांचे नवीन दुखणे यांनी तसेच अंतर्गत बंडाळ्या आणि धार्मिक पुनरुत्थान यांनी हा खंड घुसळून निघत आहे. दहशतवादी शक्तींनी दक्षिण आशियात बांधलेले जाळे हा अलीकडचा या प्रदेशाचा फार मोठा चिंतेचा विषय आहे. ज्यात २०० माणसे मारली गेली असा गेल्या वर्षीचा बालीमधील बॉंबहल्ला, जकार्ता (इंडोनेशिया) मधील मॅरियट हॉटेलवरील हल्ला, दोन वर्षांपूर्वी मनिला (फिलिपिन्स) येथे घडून आलेली बॉंबफेकीची

मालिका, अनेक ठिकाणी चर्चेसवर झालेले हल्ले किंवा सापडलेल्या दहशतवाद्यांकडून मिळालेल्या नियोजित पाश्चात्य वकालतींवरील हल्ल्यांची माहिती - या सर्व घटना दहशतवादी प्रवृत्तींवर प्रकाश टाकतात. फिलिपीन्स, कंबोडिया, मलेशिया, थायलंड, इंडोनेशिया, भारत अशा एक ना अनेक देशांतून दहशतवादी कारवायांना ऊत आला आहे. त्या त्या ठिकाणची अतिरेक्यांची केंद्रे उद्ध्वस्त करण्याची मोठी मोहीम गेल्या दोन-तीन महिन्यांत त्या त्या देशांतील पोलिसांनी हाती घेतली. त्याला बऱ्यापैकी यशही आले. या क्षेत्रांतील अनेक नेत्यांची धरपकडही करण्यात आली. पण हे सारे करताना लक्षात आले ते असे की, वाटले त्यापेक्षा कितीतरी विस्तारित नि घट्ट असे दहशतवाद्यांचे जाळे पसरलेले आहे.

या पार्श्वभूमीवर, राष्ट्राराष्ट्रांना परस्परांच्या सहकार्यानेच दहशतवादाचा बीमोड करावा लागणार आहे, आणि याची स्पष्टता राज्यकर्त्यांत होत आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्येसुद्धा परस्पर व्यापार सहकार्य करून आशियाई देशांचा समूह एकत्रितपणे कसा तग धरून राहील याची चर्चा होत आहे. भूतकाळ समान नसेल पण प्रगतीपथावरील आणि शांततेच्या मार्गावरील समान भावीकाळ घडविण्यासाठी देशांनी एकत्र येऊन, नवी आशियाई ओळख निर्माण करावी असा विचार संबंधितांमध्ये वृद्धिंगत होत आहे. 'सार्क' ('साऊथ एशियन असोसिएशन ऑफ रिजनल कोऑपरेशन,' 'एसिआन' ('असोसिएशन ऑफ साऊथ ईस्ट एशियन नेशन्स') आणि 'गल्फ कोऑपरेशन कौन्सिल' (जीईसी) अशा प्रादेशिक संघटनांचे महत्त्व वाढत चालले आहे. अर्थात, विविध कारणांनी जग जवळ येत असताना, अशी काही 'आशियाई ओळख' ही जागतिक संदर्भापासून अलग असणार नाही तर ती तिचाच एक भाग असेल अशीही अपेक्षा, 'एशियन रिलेशन्स कॉन्फरन्स'ने व्यक्त केली आहे. आज आर्थिक नि तंत्रज्ञानविषयक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या, आशियाला याही संदर्भात परस्पर सहकार्याची गरज निर्माण झाली आहे. जागतिक शांततेसाठी परस्पर सहकार्य ही तर त्याहूनही मोठी गरज ठरते आहे. प्रश्न आहे तो यासाठी समाजमन घडविण्याचा. परस्पर विश्वास नि स्नेहभाव यांच्या वृद्धीची गरज जेवढी देशांतर्गत आहे तेवढीच ती देशादेशांमधील संबंधांमध्ये आहे अशी भाषा विचारवंत बोलू लागले आहेत. ही भाषा सार्वत्रिक होणे ही आता आशियाई देशांची निकड आहे. आशियातील राष्ट्रांची ओळख करून घेण्याचा हा हेतू, नजरेआड करून चालणार नाही. ■■

# शेतीप्रधान आशिया

◆ मोठ्या प्रमाणावर संरचनात्मक बदल घडूनही दक्षिण आशियामधील अर्थव्यवस्था या प्रामुख्याने शेतीप्रधानच राहिलेल्या आहेत.

◆ श्रमप्रधान शेतीच्या वाढीतूनच ग्रामीण भागातील रोजगार वेगाने वाढणार आहे.

◆ व्यापारीकरणाच्या गरिबांच्या गरजांवर होणाऱ्या परिणामांची गांभिर्याने चिकित्सा करायला हवी.

◆ विसाव्या शतकातील अखेरीच्या दशकाने दक्षिण आशियात गरिबी वाढवली आहे.

◆ दक्षिण आशियामधील गरिबी ही मुख्यतः ग्रामीण गरिबी आहे.

◆ हरित क्रांतीच्या सामाजिक नि पर्यावरणीय दुष्परिणामांनी, झालेले अल्पसे लाभही झाकोळून टाकले आहेत.

◆ ग्रामीण आणि शेतीविकासासाठी छोटया शेतांनाच केंद्रस्थानी ठेवले पाहिजे.

◆ स्त्रिया हाच दक्षिण आशियाई शेतीचा दुर्लक्षित आणि सुप्त असा कणा आहे.

◆ जागतिक व्यापार संघटनेच्या बहुदेशी व्यापार पद्धतींचे विस्तारित परिणाम दक्षिण आशियामधील अन्नसुरक्षिततेवर झाले आहेत.

◆ अन्नसुरक्षिततेच्या सातत्यासाठी पर्यावरणाची नि लोकांच्या उपजीविकेचीु सुरक्षितता हाच आधार आहे.

◆ लोकसंख्यावाढ व अन्नपुरवठा यांमधील शर्यत हा दक्षिण आशियाचे ऐतिहसिक नि आजचे चित्र आहे.

◆ ग्रामीण विकासाचे फारच कमी उपक्रम असे आहेत की जे, गरिबांचे गरिबांकडून आणि गरिबांसाठी आहेत.

◆ सर्वच सामाजिक विकासाचे प्रकल्प हे सर्वांपर्यंत पोचण्यात अयशस्वी झाले आहेत.

◆ ग्रामीण भागातील औद्योगिक वसाहती हे खूपच महाग पडलेले अपयश मानले जाते. *(- हयुमन डिव्हलपमेंट इन साउथ एशिया २००२ द मेहबूब उल हक हयुमन डिव्हलपमेंट सेंटर, ऑक्सफर्ड प्रकाशन.)*

# म्यानमार

युनियन ऑफ बर्मा (म्यानमार)
राजधानी : रंगून
शासन : लष्करी
लोकसंख्या : ४कोटी २५ लाख
चलन : बर्मीज क्याट

म्यानमार (ब्रह्मदेश, बर्मा) हा भारताच्या ईशान्य कुशीत असलेला देश. नैसर्गिक साधनसामुग्रीने संपन्न आणि विविध संस्कृतींचा संगम असलेला देश. त्याचबरोबर उदंड समस्या आणि मर्यादित उपाययोजना हाती असलेला देश. भारताच्या पाठोपाठच म्हणजे १९४८ साली हा देश ब्रिटिशांच्या अंमलातून स्वतंत्र झाला. परंतु, स्वातंत्र्योत्तर पंचावन्न वर्षांमध्ये त्रेचाळीस वर्षे येथे लष्करी सत्ता आहे.

म्यानमारचा इतिहास अंतर्गत कलह आणि नागरी युद्धांनी भरलेला आहे. याबाबतीतला अलीकडचा इतिहास एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या बाप्टिस्ट मिशनऱ्यांच्या बर्मामधील प्रवेशापासून सुरू होतो. ब्रिटिश काळात ब्रह्मदेश हा भारताचा एक प्रांत होता. परंतु १९३० -३२ च्या सायमन कमिशनने बर्मा हा भारतापासून अलग करण्याची सूचना केली. १९३० च्या दशकात, अनेक स्वातंत्र्यचळवळींचा उदय झाला. आँग सॅन सारख्या काही युवक क्रांतीकारकांनी, जपानमध्ये प्रशिक्षण घेऊन थायलंडमधून स्वातंत्र्ययुद्ध लढण्याचा प्रयत्न केला. परंतु, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, १९४२-४३ मध्ये जपानने आक्रमण करून ब्रह्मदेश ताब्यात घेतला; आणि लगोलग १९४३ साली त्याला स्वातंत्र्यही बहाल केले. परंतु ब्रिटनच्या ताब्यात असलेला ब्रह्मदेश मात्र ४ जानेवारी १९४८ ला सूर्योदयापूर्वी स्वतंत्र झाला.

स्वातंत्र्यानंतरही राजकीय शांतता अशी म्यानमारला कधीच लाभली नाही. अंतर्गत बंडाळी, वांशिक कलह, लष्करी शासनाच्या विरोधातील 'लोकशाही' उठाव आणि परिणामतः निर्माण झालेले निर्वासितांचे प्रश्न तीव्र होत गेले. (उदाहरणार्थ, १९८४ ते २००० या काळात थायलंडमधील बर्मीज निर्वासितांची संख्या ९५०० वरून १ लाख २३ हजारावर गेली!) गरिबी, बेकारी असे प्रश्न आहेतच; आणि त्यातच मोठ्या प्रमाणावर अफूचे उत्पादन व त्याचा व्यापार हे वाढत्या प्रमाणात आहेत.

म्यानमारमध्ये आज लष्कराची सत्ता आहे. १९६२ सालच्या बंडापासून तेथे सैन्याचा विस्तारच होत गेला आहे. १९६२ ला सैनिकांची संख्या १,२५,००० इतकी

होती. ती १९८८ मध्ये १.८६,००० वर गेली. आज ती याच्या दुपटीहून अधिक आहे. एके काळी, राजकीय पक्षांच्या शिडीवरून लोक सत्तेवर येत असत. परंतु आज तशी स्थिती नाही. आज सैनिकी आणि नागरी असे दोन, परस्परांत अंतर असलेले भिन्न समाजगटच अस्तित्वात आलेले आहेत. एवढेच नव्हे तर नागरी समाजगटाचे व्यवहारही सैन्याकडूनच नियंत्रित केले जात आहेत. उदाहरणार्थ, उच्च शिक्षणाचे सर्वाधिकार सैन्याकडे आहेत; बुद्धसंघावरही त्यांचे वर्चस्व आहे आणि उच्चाधिकारावर पोचणे हे सुद्धा सर्वथैव लष्कराने निर्माण केलेल्या संस्थांकरवीच घडून येते. त्यामुळे सैन्यात जाणे हाच प्रतिष्ठेचा व्यवसाय झाला आहे.

इथल्या सैनिकी शासनाचे आणखी एक परिमाण आहे. सैन्यात बर्मन (ब्रह्मी) लोकांचेच वर्चस्व आहे. म्यानमारच्या सुमारे पाच कोटी लोकसंख्येत दोन तृतीयांश लोक ब्रह्मी वंशाचे आहेत. त्यामुळे रीति-रिवाज, नीतीनियम यांच्यावर ब्रह्मी संस्कृतीचाच पगडा आहे. ब्रह्मी भाषा हीच अधिकृत भाषा आहे आणि सरकारी शाळांमधून अल्पसंख्यकांच्या भाषांमधून शिक्षण द्यायला-घ्यायला बंदी आहे. ब्रह्मी भाषेतच शिक्षण दिले जाते. म्यानमारच्या घटनेत जरी देशातील सांस्कृतिक भिन्नतांची दखल घेतलेली असली तरी, सैनिकी शासनाने ब्रह्मी संस्कृतीचे वर्चस्व टिकवून ठेवले आहे. किंबहुना आजपर्यंतच्या बदलत्या सर्वच सरकारांना हे करावे लागले आहे.

आणखीही एक गोष्ट प्रत्येक शासनाला धरून ठेवावी लागली आहे, ती म्हणजे बौद्धधर्म. बौद्धधर्म, त्याचे संघ यांना प्रोत्साहन देऊनच सरकारे तगू शकतात, हे अगदी सैनिकी सरकारांनाही कळून चुकले आहे. ऊनू जनरल ने, वीन, जनरल थान श्वे या सर्वांनीच अनेक पॅगोडे (देवळे) उभी केली. अगदी अलीकडे १९९९ साली खिन न्युअंट यांनी प्रसिद्ध स्वेडगाव पॅगोडाचे एक टन सोन्याचा मुलामाा देऊन नूतनीकरण केले. पंतप्रधान ऊनू यांनी तर १९६० साली बौद्धधर्माला राष्ट्राचा अधिकृत धर्म म्हणून स्वीकारण्याचा प्रयत्न केला होता. परिणाम मात्र असा झाला की, त्यातून वांशिक बंडे उद्‌भवली. विशेषतः अल्पसंख्याक ख्रिश्चन आणि मुस्लिम जमातींनी कडवा विरोध केला.

म्यानमारची राज्यव्यवस्था १९६२ पर्यंत तरी सौम्य समाजवादी धर्तीची होती. मात्र १९६२ मध्ये, ने विन यांनी मिलिटरी बंड करून सत्ता ताब्यात घेतली. त्यानंतर सर्व लहान-मोठ्या उद्योगांचे व बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आणि यानंतर सातत्याने सरकारी क्षेत्र वाढतच गेले. १९६३ ते १९७८ या काळात सरकारी क्षेत्राचा विस्तार

३१.६ टक्क्यांवरून ४६. ४ टक्क्यांवर गेला. मात्र हे सहजपणे घडून आले नाही. राष्ट्रीयीकरण करून उद्योग-बँकांची सूत्रे सैन्याधिकाऱ्यांकडे गेल्यावर अनेक प्रश्न निर्माण झाले, कार्यक्षमता घटली, उत्पादन घटू लागले. सगळीकडे एकप्रकारचे भीतीचे वातावरण पसरले होते. त्याचाही परिणाम अर्थव्यवस्थेवर होत गेला. अखेरीस १९८७ साली अध्यक्ष ने विन यांनी याबाबतचे अपयश मान्य केले. परंतु प्रत्यक्ष सुधारणा करण्यात आली, ती मात्र जपानच्या सल्ल्याने, आणि तत्कालीन समाजवादापासून दूर जाण्याचा प्रयत्न चालू झाला. देश मुक्त बाजारासाठी काही प्रमाणात खुला करण्यात आला. देशातील नि परकीय खाजगी गुंतवणूकदारांना प्रोत्साहन देण्यात येऊ लागले. अर्थात, लष्कराने पक्क्या नियंत्रणाचा हात सर्व महत्त्वाच्या आर्थिक व्यवहारांवर ठेवलाच आहे.

म्यानमारची अर्थव्यवस्था फारशी मजबूत नाही. उत्पन्न-वितरणात विलक्षण विषमता आहे. ज्यांचे सत्तेवर अथवा भांडवलावर वर्चस्व आहे असा गट संख्येने छोटा पण धनाने मोठा आहे. त्याचबरोबर गरिबांची संख्या मोठी आहे. सुमारे पन्नास टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालील जीवन व्यतीत करीत आहे. आणि ती कमी होण्याची चिन्हे नाहीत. उलट विषमताही वाढत चालली आहे. म्यानमारच्या उत्तरेकडील राज्यांवर चीनचे आर्थिक वर्चस्व कमी होण्याचा धोका आहे.

अल्पसंख्याकांची वस्ती म्यानमारच्या परिघावरील सीमांवरच केंद्रित झाली आहे. आणि लष्करी शासनाचे त्यांच्याविषयीचे धोरण हे त्यांना सत्तेबाहेर ठेवण्याचे, एवढेच नव्हे तर, शासकीय मोठ्या स्थानांवर येऊ न देण्याचेच आहे. ते तसेच चालू राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांची राजकीय व आर्थिक स्थिती समाधानकारक नाही. म्यानमारच्या सीमावरील युद्धबंदी करारांमुळे त्या भागात असलेले सैन्य आणि त्या भागातील अल्पसंख्याक यांना शस्त्रे जवळ बाळगता येतात. यातून, एरवी परंपरागत शेती करीत असलेल्या अल्पसंख्यांकांच्या जीवनात सततच अशांतता असते. वास्तविक सरकारने त्यांच्या शेतीस सहाय्य करण्याची किंवा शिक्षण-आरोग्यासारख्या प्राथमिक सोयी पुरविण्याची अपेक्षा आहे, परंतु तें होत नाही. तशात या भागांतून अफूचे उत्पादन आणि त्यातून हेरॉईनसारख्या विषद्रव्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन, विक्री आणि निर्यात होत असते. बऱ्याच लोकांना या व्यवसायाबाहेर दुसरा काही रोजगार उपलब्ध नाही. त्यामुळे हा व्यवसाय बंद करण्याबाबत सरकार हतबल आहे. ही सर्व परिस्थिती, अर्थातच, वांशिक अल्पसंख्यांकाच्या वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या बंडांना पोषक ठरली

आहे. करेन्स, करेनीस, शान्स मॉन्स, चिन्स आणि कचिन्स अशी विविध प्रकारच्या भाषिक-वांशिक अल्पसंख्याकांची बंडे अधून-मधून होतच असतात.

म्यानमारमध्ये १९८८ मध्ये फार मोठा राजकीय उठाव होऊन लष्करी सरकारने त्याची क्रूर दखल घेतली. सर्व राजकीय पक्षांवर बंदी घातली. आँग सॅन स्यू क्वीच्या नेतृत्वाखालील 'नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी' पक्षाला लाखो लोकांचा पाठिंबा मिळाला. (म्यानमारमध्ये नोंदणीकृत असे २३४ राजकीय पक्ष आहेत !) अल्पसंख्याकांच्या हक्कांना अबाधित ठेवून सर्वांच्या हितासाठी स्वायत्त राष्ट्र उभारणीवर या पक्षाने भर दिला आहे. दिवसेंदिवस या पक्षाच्या कार्यकर्त्यांची धरपकड होण्याचे प्रसंग तेव्हापासून वाढताहेत. सध्या तर लोकशाहीसमर्थक नेत्या आँग सॅन स्यू क्वीला सरकारने समाजापासून दूर अज्ञातस्थळी नेऊन ठेवले आहे.

सबंध जगानेच म्यानमारमधील १९८८ पासूनच्या घटनांची दखल घेतली आहे. त्यातही मे १९९० मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये 'स्लार्क' ('स्टेट लॉ अँड ऑर्डर रेस्टेरेशन कमिटी') या सरकारी पक्षाला एकूण ४८५ जागांपैकी फक्त १० जागांवर विजय मिळाला. एकूण मतांपैकी जेमतेम २५ टक्के मते या पक्षाला प्राप्त झाली. याउलट, आँग सॅन स्यू क्वीच्या 'नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी' पक्षाला ३९२ जागा आणि ६० टक्के मते मिळाली. निवडणुकांचे निकाल स्पष्ट होते, तरीही सरकारने लोकशाही राज्य स्थापनेला विरोध करून असे जाहीर केले की, निवडणुकांचा हेतू संसद स्थापनेचा नव्हता तर केवळ घटनासमिती स्थापन करण्याचा होता; आणि तिच्या निर्मितीनंतरच सत्ताबदल करण्याचा विचार होईल. परिणामतः एक नवी अशांतता, नवी राजकीय अस्थिरता देशात निर्माण झाली आहे. फार मोठा आंतरराष्ट्रीय दबाव येत आहे तो लोकशाही निवडणुकांच्या निकालांना ठोकरून गेली बारा-तेरा वर्षे सैनिकी सरकार वापरत असलेल्या बळाच्या वापरावर !

अजूनही मोठी राजकीय अनिश्चितता म्यानमारमध्ये आहे. त्यामुळे आर्थिक सामाजिक स्थित्यंतराकडे जाण्याची म्यानमारची वाट धूसरच दिसते आहे !

*(संदर्भ - बर्मा - द कर्स ऑफ इंडिपेंडन्स- ले - शेल्बी टकर - पेंग्विन (२००१), द प्रॉब्लेम ऑफ म्यानमार अँड म्यानमारस् प्रॉब्लेम्स - डेव्हिड स्टेनबर्ग )*

■■

# थायलंड

किंगडम ऑफ थायलंड (थायलंड)
राजधानी : बँकॉक
शासन : राजा असलेले घटनात्मक शासन
लोकसंख्या : ६ कोटी ३० लाख
चलन : बाथ

नव्या जागतिक अर्थकारणात भांडवलशाहीकडे झुकलेला लोकशाही-वादी देश म्हणून थायलंडची ओळख होत असली तरी, तेथील अर्थकारण, राजकारण व समाजकारण हे गुंतागुंतीचे झाले आहे. थायलंडमधील राजेशाही १९३२ मध्ये संपुष्टात आली: नोकरशाही, लष्कर आणि कृतीशील जबाबदार नागरिक अशा तीन गटातील काही मोजक्या बुद्धिवाद्यांनी एकत्र येऊन थायलंडमध्ये ही क्रांती शांतपणे घडवून आणली. पाश्चात्य जगातील लोकशाहीच्या तत्त्वांनी हे सर्व प्रेरित झाले होते. त्यामुळे तेथील राजेशाही ही लोकशाहीत सामावली गेली. तेव्हापासून म्हणजे आज सुमारे एकाहत्तर वर्षे या देशात लोकशाही नांदते आहे. यातच काही राजवटी उलटून पाडण्याचेही प्रयत्न झाले. १९५७ मध्ये फिलबून राजवट कोसळली. १९६० च्या दशकात तेथे काही वर्षे लष्कर समर्थकांची सत्ता होती. या काळात तेथील राजेशाहीला मात्र समाजमनात स्थान होते, तसेच सरकारच्या अखत्यारीतील उद्योगांचे वर्चस्व होते.

१९७३ मध्ये तेथे विद्यार्थ्यांनी केलेली क्रांती व १९९२ मध्ये मध्यमवर्गीय नागरिकांनी केलेली क्रांती, या दोन अलीकडच्या काळातील महत्त्वपूर्ण घटना मानल्या जातात. अर्थात, या दोन्हींमुळे देशाची मूलभूत राजकीय घटना मात्र बदलली नाही. पण त्यातून राजकारणात मध्यमवर्ग सक्रीय झाला व तो सत्तास्थानी जाण्यास उत्सुक आहे, हे चित्र पुढे आले. १९७० ते १९९५ या काळात तेथील अर्थव्यवस्था तेजीत होती त्यामुळे उच्चमध्यमवर्गीयांची संख्या वाढली. या काळात ग्रामीण व शहरी अशी दरी अधिकच रुंदावली. पर्यावरणाशी संबंधित काही नव्या समस्या निर्माण झाल्या. १९९७-९८ या काळात पूर्व आशियातील आर्थिक संकटामुळे तेथील अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला. थोडक्यात, १९३२ मध्ये राजेशाही संपल्यानंतर थायलंडमध्ये पाच वेळा मोठे राजकीय चढउतार झाले. घटनात्मक लष्करी शासन, लोकशाहीचे प्रयोग, मध्यमवर्गीयांचा वैचारिक संघर्ष आणि नवीन राजकीय घटना हे अनुभवलेल्या येथील

नागरिकांना आता देशात मूळापासून लोकशाही प्रस्थापित होईल व एक नवीन युग सुरू होईल, अशी आशा वाटते आहे.

जागतिक बाजारपेठीय अर्थव्यवस्थेत, थायलंडमध्ये काही सामाजिक व आर्थिक बदल तर झालेच, पण यातून गरीब-श्रीमंत ही दरी रुंदावल्याने काही मोठे प्रश्नही उपस्थित झाले. शहरांतून वाढणारा नवश्रीमंत वर्ग, मध्यमवर्ग आणि ग्रामीण भागातील गरीब वर्ग अशी उतरंड येथे तयार झाली.

## गरिबीमुळे स्त्रिया वेश्याव्यवसायात

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत साधारणपणे जे चित्र आढळते ते येथेही दिसते. नवे उद्योग शहरांमध्ये असल्याने शहरांचा विकास वेगाने होऊ लागला. शेतीक्षेत्राकडे व ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष झाल्याने त्यांचा विकास झाला नाही. शिक्षणाच्या व रोजगाराच्या सोयी-सुविधा सर्वत्र पोचल्या नाहीत. सार्वजनिक सेवांचा लाभ सर्व नागरिकांना उपलब्ध झाला नाही. शेतीतून उत्पन्न मिळेनासे झाल्यावर खेड्यातील नागरिकांचा ओघ शहरांकडे वळला. ज्यांना संधी मिळाली त्यांनी मध्य आशियातील देशांमध्ये आणि तैवान, ब्रुनेई व सिंगापूर येथेही नोकरीसाठी जाण्याचा मार्ग पत्करला. ग्रामीण भागातून आलेले नागरिक शहरांमध्ये बांधकाम क्षेत्रात, कारखान्यांमध्ये आणि सेवाक्षेत्रातील छोटी-मोठी कामे करून उपजीविकेचा मार्ग शोधू लागले. त्यांना मिळणारे अल्पवेतन हे पुरेसे नव्हतेच. त्यामुळे त्यांच्या घरातील गरीब व अल्पशिक्षित तरुणी व महिला यांना मात्र रोजगारासाठी शरीरविक्रयाचा आधार घ्यावा लागला. आज थायलंडमधील वेश्याव्यवसाय हा जगभर कुप्रसिद्ध झाला आहे. म्हणजे पाश्चात्य देशांमधील व जपानमधील अनेक व्यक्ती केवळ या व्यवसायामुळे या देशाला भेट देतात. (थायलंडमध्ये एच.आय.व्ही. बाधित रुग्णांची संख्या जगात सर्वात जास्त आहे.)

हा व्यवसाय येथे फोफावण्यामागे आणखीही एक वेगळे सामाजिक कारण आहे. भारतात मुलगा हवा असे समाजमानस आहे, तसे थायलंडमध्ये मुलगी हवी असे समाजमानस आहे. कारण, मुलगी ही घराला सर्वप्रकारे मदत करू शकते, म्हणजे घरकामात, शेतीत व इतर कामांमध्येही तिला सहभागी करून घेता येते. तसेच येथील समाजात मातृ-पितृऋणाला फार महत्त्व आहे. मुलगा व मुलगी दोघांनीही हे ऋण मानायचे असते. येथे तरुण मुला-मुलींनी लग्नानंतर मुलीच्या आई-वडिलांच्या घराजवळ संसार थाटणे अपेक्षित आहे. त्यामुळे लग्न झालेल्या मुलीने देखील आई-वडिलांना आर्थिक मदत करणे अपेक्षित असते. त्यामुळे मुलींना पैसा कमवून घराला मदत करणे

क्रमप्राप्त ठरते. (थायलंडमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या सुमारे ४६ टक्के आहे आणि हे प्रमाण अमेरिकेच्या बरोबरीने आहे, अशी आकडेवारी 'अर्थबोधपत्रिके'च्या एप्रिल २००३ च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आली होती.)

थायलंडमधील या आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे आणि मुली-स्त्रिया या अशा व्यवसायातून नोकरदार मुलांपेक्षा जास्त पैसे कमवीत असल्याने स्त्रियांनी अर्थाजन करण्यासाठी देहविक्रय केला तरी त्यांना समाज क्षमा करतो आणि त्यांना नेहमीप्रमाणेच चांगली वागणूक दिली जाते. विरोधाभास म्हणजे येथे वेश्याव्यवसाय हा बेकायदेशीर मानला जातो. थायलंडमध्ये बौद्ध धर्म असून आणि या धर्मात वेश्यागमन निषिद्ध असूनही बौद्ध महासंघाने ही कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला नाही. तसेच आर्थिक - सामाजिक परिस्थितीमुळे मान्यता मिळालेल्या या प्रथेबद्दल समाजात उघडपणे बोललेही जात नाही. मात्र आता बौद्ध विचाराचे काही सामाजिक कार्यकर्ते व स्त्री-वादी व्यक्ती याविरूद्ध आवाज उठवीत आहेत. 'थायलंडमधील सामाजिक संस्कृतीचे चुकीचे व विकृत अर्थ घेतले जात आहेत, स्त्रियांवर केवळ आर्थिक दुरवस्थेमुळे ही वेळ आली आहे,' असे ते सांगत आहेत. 'बौद्ध विचारांच्या कक्षेत नैतिकतेचा व सर्वच सामाजिक परिस्थितीचा सर्वंकष विचार करून मानवाधिकार, आर्थिक शोषण, पर्यावरणाची हानी, मादक द्रव्यांचा प्रश्न अशा विषयांवर उत्तरे शोधली पाहिजेत,' असे येथे म्हटले जात आहे.

'स्त्रियांच्या या दुरवस्थेला त्या स्वतःच काही प्रमाणात जबाबदार आहेत. शहरांमधील वाढत्या चंगळवादाचे लोण ग्रामीण भागात पसरत असून या नवतरूणींना शेतावर काम करणे वा इतर कामे करणे, हे नको आहे. त्यामुळे आपल्या चैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी त्यांना हा घरबसला रोजगार करायचा असतो,' असेही मत समाजात आहे. या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत बौद्धधर्माचे विचार हे ग्रामीण नागरिकांना स्वयंपूर्ण व स्वतंत्र होण्यासाठी सहाय्य करू शकतील, असे बौद्ध विचारवंतांचे म्हणणे आहे.

## थायलंडची संस्कृती व 'पाश्चात्त्य विकास'

थायलंडमध्ये फार मोठ्या संख्येने चिनी नागरिक आहेत, पण ते थायलंडच्या मुख्य प्रवाहात सहज सामावून गेले आहेत. थायी मुस्लिम हे अल्पसंख्य असून ते दक्षिण भागात राहतात. थायी बौद्ध व थायी मुस्लिम यांच्यात फारसे संघर्ष झाले नाहीत. थायलंडमधील राजेशाही व बौद्ध धर्म या दोन बाबी तेथील सांस्कृतिक जीवनाच्या केंद्रस्थानी आहेत. बौद्ध धर्म लवचिक आहे. त्या धर्मात एखाद्या गोष्टीबद्दल अतिरेकी

आपलेपणाची भावना मानणे योग्य नाही. त्यामुळे की काय, येथील नागरिक आपल्या सांस्कृतिक जाणिवांबद्दल हटवादी भूमिका घेत नाहीत, असे त्या समाजातील अभ्यासकांना वाटते. ज्यावेळी जे योग्य वाटेल ते मान्य करणे, असा या समाजाचा कल आहे. त्यामुळे थायलंडमध्ये पाश्चात्यीकरण फार वेगाने होत असून त्याबद्दलही फारशी ओरड होताना तेथे दिसत नाही.

पाश्चात्य देशामधील विज्ञान, तंत्रज्ञान व इतर काही बाबींमधून आपल्या देशाचा विकास होऊ शकेल असे येथे वाटते. फार पूर्वी थायलंडने भारतातील संस्कृती म्हणजे धर्म, भाषा, साहित्य इत्यादी स्वीकारले व त्यात काही सुधारणा करून त्यांनी ते आपले म्हटले. तसेच आता पाश्चात्य संस्कृतीमधील स्वीकारण्यायोग्य बाबी या समाजात सहज मान्य होतील व कालांतराने त्या येथील संस्कृतीत सामावून जातील, त्यामुळे आपल्या देशाला सांस्कृतिक अतिक्रमणाची भीती वाटत नाही, असे येथील अभ्यासक म्हणतात. येथील संस्कृती व पाश्चात्यांचा विकास यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न येथे होताना दिसतो.

## राजकारणातील आव्हाने

थायलंडचे पंतप्रधान थकसीन शिनावात्रा यांनी जानेवारी २००१ मध्ये त्यांच्या पदाची सूत्रे हाती घेतली. तत्पूर्वी थायलंडने आर्थिक संकट नुकतेच अनुभवले होते आणि थकसीन यांनी निवडणुकांच्या वेळी म्हटले होते की, ‘थायलंडमधील प्रत्येक खेड्याने एकतरी निर्यातयोग्य उत्पादन तयार केले पाहिजे. यासाठी प्रत्येक खेड्याला आपले सरकार मोठा निधी उपलब्ध करून देईल.’ तेव्हा अनेकांना हे अशक्य कोटीतील वाटले होते. पण थकसीन यांनी काही प्रमाणात या वचनाची पूर्ती करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात, त्यांच्यासमोर आणखीही खूप प्रश्न उभे ठाकले आहेत. मादक द्रव्यांची बाजारपेठ, भ्रष्टाचार व गरिबी हे या देशासाठी फार मोठे सामाजिक प्रश्न आहेत. ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेचा व भांडवलशाहीचा लाभ घ्यायचा असेल तर थायलंडमधील स्पर्धात्मकता वाढविली पाहिजे, असे त्यांना वाटते. रोजगार व देशाची मिळकत वाढणे याला प्राधान्य देण्याचा प्रयत्न आपले सरकार करीत आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

*(संदर्भ - इंटरनेट, इकॉनॉमिक टाइम्स)*

■■

# व्हिएटनाम

सोशालिस्ट रिपब्लिक ऑफ व्हिएटनाम
राजधानी : हनोइ
शासन : साम्यवादी प्रशासन
लोकसंख्या : ७ कोटी ९० लाख
चलन : व्हिएटनाम डोंग

अमेरिकेबरोबर झालेल्या युद्धामुळे (१९७५) हा देश युद्धांच्या इतिहासात प्रसिद्ध झाला आहे. जागतिकीकरणाच्या या काळात, युद्धानंतरचा व्हिएटनाम कसा असेल, हे जाणून घेण्याची उत्सुकता अनेक अभ्यासकांना असणे स्वाभाविक आहे. त्यातच अलीकडे झालेल्या इराक युद्धामुळे, एखाद्या देशातील युद्ध व त्यानंतरची तेथील सामाजिक, राजकीय परिस्थिती याला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. इराक युद्धापूर्वीच, व्हिएटनामबद्दलचा असा एक अभ्यास केला आहे टॉम फॉक्स यांनी. व्हिएटनाममधील युद्धाच्या वेळी निर्वासितांच्या छावणीत मदत करण्यासाठी गेलेला अमेरिकेतील टॉम फॉक्स हा युवक, हळूहळू या देशाचा अभ्यासक झाला. व्हिएटनाममध्ये पत्रकार म्हणून काम करीत असताना त्याने अमेरिकेतील अनेक अधिकाऱ्यांना व्हिएटनाम समजून घेण्यासाठी मदत केली त्याप्रमाणे व्हिएटनामी नागरिकांची मनेही त्याने सांभाळली. याच कामात असताना हा युवक एका व्हिएटनामी युवतीच्या प्रेमात पडला आणि मदतकार्य संपल्यावर तिला लग्नासाठी अमेरिकेला घेऊन आला. त्यांची तीन मुले मोठी झाल्यानंतर, पंचवीस वर्षांनी, या जोडप्याने व्हिएटनामला भेट दिली. तेव्हाचा युद्धविरोधी व ध्येयवेडा , मधल्या काळात जबाबदार पत्रकार झालेला होता. या पत्रकाराच्या निरीक्षणांतून उभा राहिलेला हा 'पंचवीस वर्षांनंतरचा व्हिएटनाम'!

"बँकॉकहून निघालेल्या आमच्या विमानाने व्हिएटनामच्या दिशेने उड्डाण केले आणि व्हिएटनामच्या अनेक स्मृती मनात नाचू लागल्या. आमचे विमान भरदुपारी व्हिएटनाममधील टॅन सॉन नट विमानतळावर पोचले तेव्हा उन्हामुळे तिथे पेंगुळलेले वातावरण होते. आमची रवानगी कस्टम अधिकाऱ्यांकडे झाली. त्यांचा गणवेष पंचवीस वर्षांपूर्वीचा होता - तपकिरी हिरव्या रंगाचा (ऑलिव्ह) आणि त्यावर लाल तारका, डोक्यावर टोपी. व्हिएटनाममधील दोन -तीन आठवड्यांच्या कालावधीत कोणत्याही भावना न दर्शविता, मैत्री या शब्दापासून फारकत घेतलेल्या फक्त याच

अधिकारी व्यक्ती आम्हाला भेटल्या. व्हिएटनाम हा देश मला पूर्वी जरा गुंतागुंतीचा पण व्यक्तिसंबंध जोपासणारा वाटला होता. येथील व्यवहारात एक व्यक्तिगत स्पर्श जाणवायचा. तेव्हा अमेरिकन समाजात दुसऱ्याची काळजी करण्याची वृत्ती अजिबात नव्हती. त्यामुळे समाजजीवनातील हा फरक मला चटकन् भावला होता. युद्धाच्या काळात मला व्हिएटनाममध्ये राहणे सहज शक्य झाले ते याच कारणामुळे. विमानतळाबाहेर पूर्वी पर्यटकांना आपल्या टॅक्सीत आणण्यासाठी टॅक्सीचालकांची झुंबड उडायची. आता 'नॅशनल टूरिस्ट असोसिएशन'ने दर आखून दिले आहेत. तुम्हाला चांगल्या हॉटेलमध्ये जाण्यासाठी मार्गदर्शन करणारेही असतात. आम्हाला एका विशिष्ट हॉटेलमध्ये नेण्यासाठी या सरकारी मार्गदर्शकाला हॉटेलचालकाकडूनही कमिशन मिळणार होते, हे त्याने बोलता-बोलता कबूल केले."

युद्धानंतरचा व्हिएटनाम आता समाजजीवनात बदलताना दिसतो आहे. ('व्हिएटनाम वॉर' असा उल्लेख अमेरिकेत व जगभरात अनेकदा होत असतो पण व्हिएटनाममध्ये मात्र त्याचा उल्लेख 'अमेरिकन वॉर' असा होतो !) युद्धाच्या आठवणी विस्मृतीत टाकण्याचा प्रयत्न बऱ्याच प्रमाणात जाणीवपूर्वक होत आहे. अमेरिकेच्या साम्राज्यवादी धोरणाची हार झाल्याचा आनंद हनोई शहरात आणि संपूर्ण व्हिएटनाममध्येच झाला असल्याचे जाणवते.

व्हिएटनाममधील लोकसंख्यावाढीचा दर युद्धानंतर हळूहळू वाढत असून २००० मध्ये तो ३.३ टक्के एवढा झाला आहे. या देशातील अर्धी लोकसंख्या विशीच्या आतील आहे. साम्यवादी राजवटीच्या श्रृंखला पूर्णपणे गळून पडल्या नसल्या तरी समाजजीवनात स्वातंत्र्य फुलते आहे. शहरांमधील कर्फ्यू प्रकार विसरला गेला आहे आणि रस्ते माणसांनी गजबजलेले आहेत. जागतिकीकरणाचे वारे वाहत आहेत, संगणक साक्षरता वाढत असून इंटरनेट वापरणाऱ्यांची आणि इंटरनेटसाठी कॅफेचालविणाऱ्यांची संख्याही वाढते आहे. सध्या जो तो, जास्तीत जास्त वेळ नवीन काही शिकण्यासाठी व पैसा मिळविण्यासाठी खर्च करतो आहे. 'जुने जाऊ द्या मरणालागुनी,' असे म्हणून येथील समाज, युद्धाच्या आठवणी पुसून टाकण्याच्या व नव्या जगात सहभागी होण्याच्या प्रयत्नात आहे.

जपानमधील होंडा कंपनीच्या गाडीतून फिरणारा वर्गही येथे आहे. जागतिक पातळीवर उत्पादन करणाऱ्या मोठ्या कंपन्यांचे कपडे व बूट येथे आता सर्रास वापरले

जातात. सेलफोन वापरणे आता प्रतिष्ठेचे व आवश्यक मानले जात आहे. येथे एक प्रकारचे उत्साहाचे वातावरण जाणवत असले तरी युद्धामुळे येथील कौटुंबिक जीवनाला काही प्रमाणात तडे नक्कीच गेले आहेत. अनेक कुटुंबातील कोणी ना कोणी व्यक्ती युद्धाच्या काळात व्हिएटनाम सोडून अमेरिका, कॅनडा, फ्रान्स व ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये स्थलांतरित झाल्या. असे लाखो व्हिएटनामी नागरिक आता मायदेशाशी पुन्हा संबंध जोडताहेत. त्यातील काही तर व्हिएटनाममध्ये परत येण्यास उत्सुक आहेत. इंटरनेटमुळे परदेशांतील या नागरिकांचा मायभूमीशी व नातेवाईकांशी पुन्हा एकदा संबंध जुळून येत आहे. हे नागरिक पैसा घेऊन मायदेशी परत येत असल्याने येथील समाजजीवन आणखी आधुनिकतेकडे जात आहे. त्यातही स्थलांतरितांमध्ये, दक्षिण व्हिएटनाममधील नागरिकांची संख्या मोठी असल्याने व उत्तर व्हिएटनामच्या तुलनेत दक्षिण व्हिएटनामकडे परदेशांतील पैसा वळल्याने तो भाग अधिक लवकर संपन्न होत आहे. येथे महत्त्वाचे म्हणजे येथील राजकारणात मात्र उत्तर व्हिएटनाममधील नागरिकांचे वर्चस्व आहे. त्यामुळे दक्षिण भागाचा हा आर्थिक विकास या राजकारण्यांना झोंबणारा ठरला आहे.

साम्यवादाला कवटाळलेल्या व्हिएटनामच्या समाजजीवनात धर्माचे अस्तित्व मर्यादितच आहे. येथे व्हिएटनामी, चिनी, म्युओंग,ताय, मेओ, ख्मेर, मॅन इत्यादी अनेक वंशांचे लोक राहतात. बौद्ध धर्म, ताओपंथ, रोमन कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट्स, मुस्लिम आणि असेच काही स्थानिक धर्म येथे आहेत. पूर्वीपेक्षा आता धार्मिक मोकळेपणा अधिक आहे. तरी काही धार्मिक नेत्यांची आणखी धार्मिक स्वातंत्र्याची मागणी (१९९९) आहे. तर चर्चमधील अशा घडामोडींकडे येथील शासन साशंक नजरेनेच बघत असते.

व्हिएटनाममधील बौद्ध धर्माचे अभ्यासक रॉबर्ट टॉपमिलर ( हे अमेरिकेतील केंटुकी विद्यापीठातील इतिहासाचे प्रोफेसर आहेत. त्यांना या विषयात डॉक्टरेट मिळाली आहे.) म्हणतात की, व्हिएटनाममध्ये बौद्ध धर्म मोठ्या प्रमाणावर पसरला असून त्यावर हिंदू धर्माचा व चीनमधील ताओइझमचा बराच प्रभाव पडलेला आहे. युद्धानंतरच्या व्हिएटनामला स्वबळावर उभे करण्यात बौद्ध धर्माचा किती व कसा उपयोग होऊ शकतो याचा विचार येथे अनेक व्हिएटनामी नागरिक करीत आहेत.

व्हिएटनाममध्ये अनेक प्रकारच्या सुधारणा होत असल्या तरी एकंदरीत हा देश गरीब गटातच मोडणारा आहे. येथील सर्वसामान्य नागरिकाचे दरदिवशीचे सरासरी उत्पन्न एक अमेरिकन डॉलर (म्हणजे १४,०२९ व्हिएटनामी डोंग) एवढेच आहे. युद्धसंपल्यानंतर या देशाने स्व-बळावर उभे राहावे अशी अपेक्षा आंतरराष्ट्रीय पातळीवर

केली गेली. या देशाला पूर्वी कायम मदतीचा हात देणाऱ्या सोव्हिएट युनियनचे अस्तित्व संपल्यानंतर व्हिएटनामने मदत तरी कोणाची घ्यायची, असा प्रश्न उभा ठाकला होता. असे असूनही गेल्या दहा वर्षात या देशाने गरिबी दूर करण्यात बराच मोठा टप्पा गाठला आहे. १९९३ मध्ये दारिद्र्यरेषेखालील गरिबांची संख्या ५८ टक्के होती ती १९९८ मध्ये ३७ टक्के एवढी कमी झाली.

जागतिक बँकेच्या अहवालानुसार येथील ९० टक्के नागरिक साक्षर आहेत. व्हिएटनामची जेवढी प्रगती झाली आहे तेवढीच प्रगती करणाऱ्या राष्ट्रांमधील बालमृत्यूचा दर, दरहजारी ६० ते ९० आहे तर व्हिएटनाममध्ये हे प्रमाण फक्त ३४ आहे. जागतिक पातळीवर सामान्यतः आढळणारी बाब येथेही आढळते. ती म्हणजे गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी वाढतेच आहे. सोव्हिएट रशियाकडून अनेकविध वस्तूंची मोठी आयात करणाऱ्या या गरीब देशातील ग्राहक आता नवनवीन वस्तू घेण्यासाठी अधीर झाला आहे. त्यामुळे अनेक परदेशी कंपन्यांना येथे ग्राहक मिळत आहेत. उदाहरणार्थ, १९९६ मध्ये, अमेरिकेतील ४०० पेक्षा जास्त कंपन्या व्हिएटनाममध्ये व्यापार करीत होत्या. केवळ परदेशातील कंपन्यांचाच व्यापार येथे वाढला आहे असे नाही तर स्थानिक नागरिकांमध्येही उद्योजकता वाढताना दिसते. या देशाचा राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर १९९९ मध्ये ४.५ टक्के एवढा होता व तेव्हा पूर्व आशियातील विकसनशील देशांमधील वाढीच्या दराच्या तुलनेत तो पहिल्या क्रमांकावर होता. व्हिएटनामवर परकीय कर्जाचा बोजा मात्र फारच कमी आहे. 'अमेरिकन वॉर'चा एक मोठा दुष्परिणाम मात्र येथे अजूनही जाणवतो. तो म्हणजे अमेरिकेने युद्धाच्या वेळी, १९६२ ते १९७१ या काळात, येथे 'एजंट ऑरेंज' हे रसायन फवारल्याने येथील पर्यावरणाचे फार मोठे नुकसान झाले आहे. दक्षिण व्हिएटनाममधील अनेक जंगले यामुळे नष्ट झाली असून जमिनी ओसाड झाल्या आहेत. यामुळे वातावरण प्रदूषित होऊन कॅन्सरचे तसेच जन्मतःच होणाऱ्या शारीरिक व्यंगाचे प्रमाणही वाढले आहे. अमेरिकेच्या सैनिकांनी पेरलेले सुरूंग व न फुटलेले बाँब यांचा शोध घेऊन ते नष्ट करण्याची तयारी अमेरिकेने आता दर्शविली असली तरी आता तेथील नागरिकांना अमेरिकेच्या सैनिकांचे दर्शन देखील नको आहे. त्यामुळे हा प्रश्न गंभीर आहे. दरम्यान नव्या अर्थकारणात, व्हिएटनामच्या नागरिकांना देशाचा विकास तर हवा, पण आपले सार्वभौमत्व व नैसर्गिक साधनांवरील अधिकारही कायम ठेवायचा आहे. हे कसे साधायचे ? हा त्यांच्यापुढील मोठा प्रश्न आहे.

■■

# मलेशिया

मलेशिया
राजधानी : क्वालालंपूर
शासन : राजा असलेले घटनात्मक शासन
लोकसंख्या : २ कोटी २४लाख
चलन : रिंगी

मलेशियातील सध्याच्या परिस्थिती -बाबतचे एक भाष्य बोलके आहे. त्यात म्हणण्यात आले आहे की, "गेल्या काही वर्षांपासून मलेशियाच्या अर्थव्यवस्थेची फार वेगाने पुनर्रचना करण्यात येत आहे. इंग्लंड व इतर युरोपीय देशांनी शेतीव्यवस्थेवर आधारित असलेली अर्थ व समाजव्यवस्था बदलण्यासाठी सुमारे तीनशे वर्षे घेतली; तर मलेशियावर फक्त ३० वर्षांत हे बदलण्यासाठी दडपण आणण्यात येत आहे. मलेशियातील या बदलांवर जागतिकीकरणाचा प्रभावही पडतो आहे, त्यामुळे बदलाची ही प्रक्रिया अधिकच गुंतागुंतीची होत आहे. यामुळे सध्या येथील नागरिक फार मोठ्या बदलांना सामोरे जात आहेत. येथील मध्यमवर्गीयांची संख्या भरपूर वाढली असून त्यांचे राहणीमानही उंचावले आहे. औद्योगिकीकरणामुळे शहरीकरण झपाट्याने झालेले दिसते. आज देशामधील निम्मी लोकसंख्या ही शहरांमधून वास्तव्य करीत आहे. पण शहरांत असलेली ही लोकसंख्या खऱ्या अर्थाने 'शहरी' झाली का ? हा प्रश्नच आहे. याशिवाय, नागरिकांमधील आर्थिक असमानता वाढतेच आहे. वांशिक भिन्नतेप्रमाणे, सामाजिक असमतोलही वाढतो आहे. या सर्व गदारोळात मानवी वागणुकीशी संबंधित विविध मानसिक पैलू दुर्लक्षिले जात आहेत." मलेशियातील एका मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या 'सेंटर ऑफ सोशिओ-इकॉनॉमिक रिसर्च अँड ह्युमॅनिस्टिक डिव्हलपमेंट' या विभागातर्फे आयोजित केलेल्या एका चर्चासत्राच्या (मार्च २००३) निमित्ताने हे विचार लोकांपुढे मांडण्यात आले होते.

सामाजिक परिस्थिती अशी बदलत असताना मलेशियातील राजकारणही एका वेगळ्या टप्प्यावर येऊन पोचले आहे. मलेशियाचे पंतप्रधान महाथीर मोहम्मद यांनी आपली निवृत्ती जाहीर केली आहे. 'युनायटेड मलय नॅशनल ऑर्गनायझेशन' (UMNO) या पक्षाचे नेतेपद व पंतप्रधानपद ऑक्टोबर २००३ च्या सुमारास सोडण्याचा आपला मानस त्यांनी गेल्या वर्षी बोलून दाखविला होता, तेव्हा नागरिकांना ही राजकीय खेळी

वाटणे स्वाभाविक होते. पण त्यानंतर वर्षानेसुद्धा महाथीर मोहम्मद आपल्या निर्णयावर ठाम आहेत (अर्थात, अजूनही शेवटच्या क्षणी काय घडेल ते सांगता येत नाही). त्यांनी गेली २२ वर्षे इंडोनेशियाचे नेतेपद जबाबदारीने सांभाळले असून, वयाची ७६ वर्षे पूर्ण केली आहेत. (महाथीर मोहम्मद यांचे वडील हे भारतीय मुस्लिम व शिक्षक होते.) त्यांचा कार्यभार सध्याचे उपपंतप्रधान अब्दुल्ला बडावी हे स्वीकारणार आहेत. महाथीर यांचीच धोरणे पुढे राबविण्याचा त्यांचा प्रयत्न राहील असा अंदाज आहे.

मलेशियातील राजकारणाची वळणे, तेथील समाजस्थितीचे दर्शन घडवितात. महाथीर मोहम्मद हे १९७४ मध्ये शिक्षणमंत्री आणि १९७६ मध्ये उपपंतप्रधान होते. १९८१ पासून ते देशाचे पंतप्रधान आहेत. तेव्हापासून त्यांनी राबविलेल्या आर्थिक धोरणांमुळे आज तेथे फार मोठा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे, असे म्हटले जाते.

मलेशियातील निम्म्यापेक्षा जास्त लोकसंख्या ही मलय म्हणजे मुस्लिम आहे. ३३ टक्के चिनी नागरिक आणि उर्वरित भारतीय आणि इतर काही धर्मीय आहेत. १९५७ मध्ये ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मलेशियाला चिनी नागरिकांच्या वर्चस्वाचा धोका जाणवत होता. अखेरीस चिनी बहुसंख्य असलेले सिंगापूर मलेशियापासून वेगळे झाले; तरी १९६९ मध्ये मलय व चिनी यांच्यात एक मोठी वांशिक दंगल झाली. त्यानंतर महाथीर यांच्या कारकीर्दीत अद्याप दंगल झालेली नाही. मात्र येथील समाजकारण व राजकारण मलय-मुस्लिम धर्माच्या अनुषंगाने घडलेले आहे. स्वातंत्र्याच्या काळात 'युनायटेड मलय नॅशनल ऑर्गनायझेशन' (UMNO) पासून एक धार्मिक गट फुटून त्यांनी 'पॅन मलायन इस्लामिक पार्टी' (PMIP) स्थापन केली होती. धर्मावर भर देणाऱ्या या पक्षाने 'युनायटेड मलय नॅशनल ऑर्गनायझेशन' या पक्षाच्या नेत्यांचे चिनी नागरिकांच्या 'मलायन चिनी असोसिएशन' बरोबरचे युतीचे धोरण अमान्य केले होते. 'युनायटेड मलय नॅशनल ऑर्गनायझेशन' या पक्षाला राजकारणात वर्चस्व मिळविण्यासाठी मुस्लिमांना दूर ठेवून चालणार नव्हते. याच काळात महाथीर मोहम्मद यांनी मलय नागरिकांमधील मागासलेपणा दूर करून, हा समाज पुढे येण्यासाठी करण्याच्या योजना यासाठी युवकांना जागरूक केले. यासंबंधी त्यांनी एक पुस्तकही लिहिले. या पुस्तकाबद्दल दोन शब्दात सांगायचे झाले तर त्याला 'सांस्कृतिक क्रांती' असे म्हणता येईल. अन्वर इब्राहिम हा तरूण नेता महाथीर मोहम्मद यांच्या मदतीला आला. या तरूणाची पार्श्वभूमी धार्मिक नव्हती आणि तो इंग्रजी माध्यमातून शिकलेला होता. महाथीर मोहम्मद व अन्वर इब्राहिम यांनी मुस्लिम समाजाचे मागासलेपण दूर करण्यासाठी जो सुवर्णमध्य

साधला त्याचा फायदा समाजाला व पक्षाला झाला. उदाहरणार्थ, महाथीर मोहम्मद यांनी बुरखा घालणाऱ्या मुस्लिम तरूणींना परीक्षेच्या वेळी ओळखपत्राबाबत अडचण निर्माण झाली ती दूर केली. बहुपत्नीकत्व मान्य करणाऱ्या अल-अर्कम या धार्मिक गटावर त्यांनी बंदी घातली. सौंदर्यस्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या मुस्लिम तरुणींना अटक करण्यात आली तेव्हा त्यांनी त्याचा विरोध केला व तरुणींना मदत केली. इंग्रजी भाषेचे महत्त्व जाणून त्यांनी उच्च माध्यमिक शिक्षणात त्याचा समावेश केला. मलेशियातील मुस्लिमांनी जगाच्या बरोबर चालावे असे त्यांना वाटत होते. मलेशियाचा धर्म इस्लाम आहे कारण तेथील बहुसंख्य जनतेचा तोच धर्म आहे. पण मलेशिया हे 'इस्लामी राज्य' नाही हेही ध्यानात घेतले पाहिजे. तेथे इस्लामचे कायदे लागू होत नाहीत. मोहम्मद यांच्या नेतृत्वाखालील मलेशियाने इस्लाम धर्म मानणाऱ्या राष्ट्रांच्या सभेत भाग घेतला; पण आपल्या देशांतील धर्मांधतेला विरोध केला. तसेच पश्चिमेशी विशेषतः अमेरिकेशी मैत्री करताना अमेरिका व ब्रिटनलाही बोस्निया व इराकबाबत त्यांचे धोरण चुकले हे ठणकावून सांगितले.

१९९७-९८ च्या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी मलेशियाला अमेरिकेची मदत घ्यावी लागली नाही. याच काळात अन्वर इब्राहिम यांची राजकीय ईर्षा वाढू लागली होती. त्यांच्या समर्थकांनी त्यांना उपपंतप्रधानपद मिळावे असा दबाव आणण्यास सुरूवात केली. मलेशियाने आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी अन्वर यांना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा मार्ग योग्य वाटत होता. पण त्यामुळे मलेशिया अमेरिकेच्या हातात जाण्याची भीती होती. या मुद्यावरून महाथीर मोहम्मद व अन्वर यांच्यात वाद झाले. अमेरिकेच्या अंकित होण्यापासून महाथीर मोहम्मद यांनी देशाला वाचविले, म्हणून राजकारणात ते वरचढ ठरले. अन्वर यांची राजकीय कारकीर्द धोक्यात येण्याची चिन्हे दिसू लागली. तेव्हा त्यांनी भ्रष्टाचाराचा मुद्दा वर उचलून मोहम्मद यांच्याविरूद्ध बंड पुकारले. देश अस्थिर होऊ नये म्हणून अन्वर यांना सरकारने अटक केल्यानंतर अन्वरच्या पत्नीने त्यांचे बंड पुढे चालू ठेवले. पण या बंडाचा फायदा 'पॅन मलायन इस्लामिक पार्टी' (PMIP) ने घेतला. आता तेथील राजकारणात इस्लाम धर्म प्रभावी ठरण्याची शंका निर्माण झाली असतानाच अमेरिकेतील ११ सप्टेंबरच्या घटनेमुळे मलय-मुस्लिम सचिंत झाले. त्यानंतरच्या घडामोडी, मलेशियाला वेगळ्या वळणावर नेणाऱ्या ठरू शकल्या असत्या; पण महाथीर मोहम्मद यांनी तसे होऊदिले नाही. तरीही आता मात्र मलेशियातील राजकारण व समाजकारण पूर्वीच्या तुलनेत, इस्लामच्या घोड्यावर स्वार झालेले दिसते. *(संदर्भ - इंटरनेट, इकॉनॉमिस्ट, एफ.ई. ई. आर. )* ■■

# सिंगापूर

रिपब्लिक ऑफ सिंगापूर
राजधानी : सिंगापूर
शासन : रिपब्लिक
लोकसंख्या : ४५ लाख
चलन : सिंगापूर डॉलर

सिंगापूर म्हणजे, सिंगापूरा, सिंहाचे शहर (लायन सिटी) होय. याचे जुने नाव टेमासेक. आग्नेय आशियातील व्यापार-उद्योगात आघाडीवर असलेला व पर्यटकांचे आकर्षण असलेला हा एक छोटासा देश. या देशाच्या मूळ जमातींबद्दल किंवा संस्कृतीबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. ओरांग लाउट अशी एक जमात येथे वास्तव्यास होती, असे एक मत आहे. या देशाचा इतिहास असे सांगतो की, चौदाव्या शतकानंतर अरबांनी मलाक्का बेटात पाय रोवले तेव्हा मलेशियाच्या जवळचे म्हणून येथे मुस्लिम लोक स्थिरावले. कालांतराने ब्रिटिशांनी पूर्वेकडे विशेषतः चीनबरोबर व्यापार करणे सोयीचे जावे म्हणून या बेटावरील तत्कालीन प्रमुख टेमेंगगोंग अब्दुल रहमान याच्याबरोबर १८१९ मध्ये एक करार केला. या काळात तेथे डचांनी पण पाय रोवले होते. त्यामुळे इंग्रज व डच यांच्यातही एक करार झाला. हळूहळू येथे व्यापार वाढू लागला. चीनलाही पश्चिमेबरोबर व्यापार वाढविण्यासाठी सिंगापूर बेटाची मदत होऊ लागली. युरोप व आशिया यांच्यातील व्यापारी दुवा म्हणूनच सिंगापूरची जडण-घडण झाली. आजही ती बऱ्याच अंशी कायम आहे. व्यापाराच्या माध्यमातून येथे ईस्ट इंडिया कंपनीने आपले वर्चस्व स्थापन केले. १९४२ ते १९४५ या काळात जपानने येथे अंमल स्थापन केला होता. त्यानंतर १९६५ मध्ये सिंगापूर हे मलेशियापासूनही वेगळे होऊन स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आले.

१९०० ते १९६० या काळात चीनमधील घटनांचा प्रभाव सिंगापूरवर पडत होता. दरम्यान चीनमधील अनेक नागरिकांनी उपजीविकेसाठी सिंगापूरमध्ये जम बसविला होता. मले किंवा मलय या वंशाचे लोक येथे होतेच. काही भारतवंशीय देखील येथे उपजीविकेसाठी स्थिरावले. १९८९ च्या आकडेवारीप्रमाणे सिंगापूरमध्ये सुमारे ७६.४ टक्के चिनी (चीन, हाँगकाँग, तैवान येथील चिनी नागरिक तसेच जे मलय नागरिक चिनी किंवा इंग्रजी ही आपली पहिल्या क्रमांकाची भाषा मानतात ते नागरिक), १४.९ टक्के मले (मलेशिया, इंडोनेशिया, जावा-सुमात्रा, अॅचनीज किंवा सुदानीज इ.), ६.४

टक्के भारतीय (तामिळ,मल्याळी, शीख, पंजाबी किंवा पाकिस्तान, श्रीलंका व बर्मा येथील नागरिक) आणि २.३ टक्के इतर अशा वंशांचे लोक राहतात. सिंगापूरमधील चिनी नागरिकांमध्ये समावेश असलेले, पण जे इंग्रजी किंवा मले भाषा बोलतात त्यांना 'बाबा चायनीज' असे म्हटले जाते. चीनमधून स्थलांतरित झालेले नागरिक व स्थानिक स्त्रिया यांच्या विवाहांतून निर्माण झालेली ही प्रजा आहे.

चिनी वंशावळ या गटात मोडणाऱ्या नागरिकांची संख्या येथे सुमारे तीन चतुर्थांश असल्याने सिंगापूरमधील राजकारणात, प्रशासनात व शिक्षण क्षेत्रात त्यांचेच प्राबल्य राहिले आहे. वरून खाली अशा मार्गाने, समाजातील उतरंडीचा विचार करता, पहिल्या क्रमांकावर असलेल्या या नागरिकांजवळ शैक्षणिक पात्रता, भाषिक कौशल्य आणि बऱ्यापैकी पैसा असे सर्व काही आहे. मले किंवा मलय म्हणजे मुस्लिम असे समीकरण झाले असून हे नागरिक समाजातील दुसऱ्या क्रमांकावर आहेत. कट्टर धार्मिकता ही या गटाची विशेषता राहिली आहे. मादक द्रव्ये आणि इतरही काही गुन्ह्यांमध्ये हा समाज जास्त प्रमाणात अडकलेला आहे. मुस्लिम समाजाचे शिक्षण हा एक प्रमुख राष्ट्रीय प्रश्न आहे, असे तेथील सरकारने १९८२ मध्ये म्हटले होते. यानंतर तेथील मुस्लिम समाज प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण आपल्या समाजापर्यंत पोचविण्यासाठी कार्यरत झाला आहे. त्याचा थोडा परिणाम होताना दिसतो आहे. सरकारने देखील शिक्षणविषयक योजना हाती घेतल्याने या योजनांचा परिणाम जाणवतो आहे. भारतीय वंशाचे नागरिक - विशेषत; दक्षिण भारतीय, येथे स्थिरावले असले तरी भारतीय समाजाची उतरंड (दक्षिण भारतातील) येथेही थोड्याफार प्रमाणात कायम राहिली आहे.

१९६५ मध्ये सिंगापूर स्वतंत्र झाल्यानंतर सिंगापूरची अस्मिता किंवा ओळख (identity) कोणती, यावर तेथे बरीच चर्चा झाली. अखेरीस आशियातील आपली पाळे-मुळे कायम ठेवायची, व्यक्तिस्वातंत्र्य व परंपराही कायम ठेवायच्या आणि इंग्रजीला महत्त्व देऊन पश्चिमेशी असलेले व्यापारी संबंधही वाढवायचे, असे तेथ अनौपचारिकरीत्या ठरविण्यात आले. त्यामुळे सिंगापूरचे आर्थिक स्थैर्य चांगले राहिले. अजूनही सिंगापूरची राष्ट्रीय अस्मिता स्पष्ट झालेली नाही. पण व्यक्तीपेक्षा समाजाचे हित, कुटुंबात मूल्यव्यवस्था जोपासणे, संघर्ष न करता समन्वयाने देशांतर्गत प्रश्न सोडविणे आणि वांशिक व धार्मिक सलोखा कायम ठेवून सहिष्णूता वाढविणे या मूल्यांना तेथे केंद्रस्थानी ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. येथील नेत्यांनी आपण पाश्चात्यांच्या गटात

मोडतो किंवा येथील समाजात पूर्णपणे 'कॉस्मो' वातावरण आहे, असे कधीच बाह्य जगाला दर्शविले नाही. आपण 'एशियन' आहोत, असे म्हणून त्यांनी पाश्चात्यीकरण पूर्णपणे स्वीकारलेले नाही.

सिंगापूरमधील बहुतांशी नागरिक दोन भाषा बोलतात; एक इंग्रजी आणि दुसरी आपली मातृभाषा. सिंगापूर हे प्रथमपासून व्यापारी केंद्र राहिल्याने आंतरराष्ट्रीय व्यवहार करणे सोयीचे जावे म्हणून व्यवहारात इंग्रजी भाषा जास्त प्रमाणात स्वीकारली गेली आहे. मात्र त्याचवेळी मँडरिन चायनीज, मलय आणि तामिळ या भाषांना 'मूल्यशिक्षण देणाऱ्या सांस्कृतिक भाषा' म्हणून महत्त्व देण्यात आले आहे. तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय शिक्षणात नैतिक मूल्ये व धर्म यांचा अंतर्भाव व त्यासंबंधीचे स्वातंत्र्य असल्याने कोणत्याही एका वंशाला आपल्याला कमी प्राधान्य मिळाले आहे, असे वाटले नाही.

सिंगापूरमध्ये १९७० व १९८० च्या दशकांत औद्योगिक व आर्थिक विकास झाल्याने आर्थिक विषमता कमी झाली; तसेच समाजाचा विकास झाला. विशेषतः, इंग्रजी भाषा येणाऱ्यांना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या. १९६० ते १९८९ या काळात राहणीमानाचा स्तरही उंचावला. १९५३-५४ या काळात पोटभर अन्नही मिळू न शकणाऱ्या नागरिकांची टक्केवारी १९ होती. १९८२-८३ या काळात ही टक्केवारी कमी होत होत ती ०.३ एवढी कमी झाली. १९७२-७३ या काळात बेताची गरिबी असलेल्या नागरिकांची टक्केवारी ३१ होती. १९८२-८३ या काळात ती ७ टक्क्यांपर्यंत घसरली. या काळातील आर्थिक विषमता कमी होण्यामागे स्त्रियांचा सर्व क्षेत्रांतील वाढलेला सहभाग, हे एक महत्त्वाचे कारण मानले गेले आहे. १९८५ मध्ये पंधरा वर्षांवरील मुली व स्त्रिया यांच्यापैकी ४६ टक्के स्त्रियांना नोकरी वा व्यवसायातून रोजगार उपलब्ध झाला होता. विवाहित स्त्रियांपैकी ३३ टक्के स्त्रिया नोकरी करीत होत्या.

१९८० च्या दशकातील एका सर्वेक्षणानुसार सिंगापूरमधील बहुतांश नागरिक स्वतःला मध्यमवर्गीय समजतात. साधारणपणे 'पाच ते सहा खोल्यांचे घर,' ग्राहकोपयोगी उपकरणे, छंद, खेळ वा इतर बाबींवर थोडा पैसा खर्च करता येणे, स्वतःचे वाहन नसले तरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा लाभ घेणे म्हणजे मध्यमवर्गीय,' अशी व्याख्या येथे रूढ आहे.

उच्च मध्यमवर्गीय गटात प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकारी, व्यवस्थापन व बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील किंवा देशांतर्गत विविध व्यावसायिक क्षेत्रांतील मंडळी यांचा समावेश होतो. बौद्धिक काम आणि अंगमेहनतीचे किंवा एक साचेबद्ध काम यांतील फरक हा सिंगापूरमध्ये सर्वच कंपन्या करतात. उद्योगव्यवसायात किंवा कार्यालयात कनिष्ठ पातळीवर असलेल्या व्यक्ती आपले व्यावसायिक कौशल्य वाढविण्याच्या प्रयत्नात असतात. अर्थात्, दरवेळी त्यांना पुढे जाण्यास संधी मिळतेच असे नाही. तरीदेखील येथील नागरिकांचे जीवनमान बरेच चांगले राहिले आहे. सुमारे ९० टक्के नागरिकांची स्वत:च्या मालकीची घरे आहेत. त्यामुळे की काय, येथील बांधकाम व्यावसायिकांमध्ये सध्या मंदीचे वातावरण आहे.

अलीकडेच सिंगापूरमध्ये सार्सचा प्रादुर्भाव झाल्याने व आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळे अनेकांना नोकऱ्या गमवाव्या लागल्या आहेत. आर्थिक क्षेत्रात त्वरेने काही पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे. यंदा २००३ च्या पहिल्या सहामाहीत सिंगापूरचा आर्थिक विकास काही प्रमाणात मंदावला आहे. पर्यटनउद्योग हा येथे एक मोठा उद्योग आहे. पण सार्समुळे त्यावर विपरित परिणाम झाल्याने या उद्योगाशी संबंधित नागरिकांची फार अडचणीची परिस्थिती झाली आहे. सध्याच्या स्थितीत पन्नास टक्के सुधारणा झाली तरीही एकंदरीत हे क्षेत्र तोट्यातच राहणार आहे. आर्थिक सुधारणा करताना खर्चात कपातीचे धोरण राबविले जाईल आणि त्यातून बेरोजगारी आणखी वाढण्याची शक्यता आहे. अमेरिकेतील अर्थव्यवस्था अद्याप सुरळीत न झाल्याने सिंगापूरची निर्यातही कमी राहण्याची शक्यता आहे. आता दुसऱ्या सहामाहीत येथील आर्थिक परिस्थिती थोडी सुधारेल, अशी आशा आहे.

सिंगापूरच्या स्थापनेपासून तेथे 'पीपल्स ॲक्शन पार्टी' हा एकमेव मोठा राजकीय पक्ष असल्याने सर्व धोरणे ही त्यांच्याच विचारसरणीतून राबविली गेली आहेत. आजपर्यंत येथील सरकारच्या धोरणांचा स्पर्श नागरिकांच्या जीवनाच्या प्रत्येक बाजूला झालेला आहे. पालक जसे आपल्या पाल्याची पूर्ण काळजी घेतात तसे, येथील सरकार नागरिकांची काळजी घेईल, असे राजकीय व सामाजिक वातावरण येथे पूर्वीपासून झालेले आहे. आता मात्र नागरिकांचे विचार जाणून घेण्यासाठी व त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी तेथे आर्थिक, सामाजिक व राजकीय सुधारणांचा कार्यक्रम आखण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. *(संदर्भ - एफ.ई.ई.आर., इंटरनेट)* ■■

# इंडोनेशिया

| |
|---|
| रिपब्लिक ऑफ इंडोनेशिया |
| राजधानी : जकार्ता |
| शासन : रिपब्लिक |
| लोकसंख्या : २२ कोटी ४७ लाख |
| चलन : रुपैय्या |

जागतिक राजकारणात सध्या इंडोनेशियाची प्रतिमा 'एक कर्जबाजारी आणि दहशतवादाने पोखरलेले राष्ट्र' अशी झाली असली तरी तेथील अध्यक्षा मेगावती सुकार्नोपुत्री यांच्या सरकारने देशांतर्गत सुधारणा नेटाने चालू ठेवल्या आहेत. त्यांच्या धोरणांचे काही चांगले परिणाम जाणवू लागले आहेत. २००२ या वर्षात आर्थिक वाढीचा दर ४ टक्के राहिला आणि परकीय चलनाच्या गंगाजळीत वाढ होऊन इंडोनेशियातील चलनाचे - रुपैय्याचे मूल्यही थोडेसे वाढले. सरकारच्या अखत्यारीतील बँका व दूरसंचार सेवाक्षेत्रातील सरकारचे समभाग (शेअर्स) विकण्याचा निर्णय घेतल्याने आणि राजकोषीय शिस्त अंमलात आणल्यामुळे आर्थिक परिस्थितीत थोडी सुधारणा झाली, असे तज्ज्ञांना वाटते. पण देशाची आर्थिक घडी नीट करतानाच तेथील सरकारला राजकीय, धार्मिक व सामाजिक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

इंडोनेशियात सध्या ॲच विभागातील फुटीरतावाद्यांचा प्रश्न सरकारला एक मोठी डोकेदुखी ठरला आहे. गेल्या दोन दशकांपासून हा प्रश्न सुटला नसून त्यात हिंसाचारही होतो आहे. इंडोनेशियाच्या पश्चिमेला व सुमात्रा बेटाच्या उत्तर टोकावर असलेल्या या छोट्या प्रांताला इंडोनेशियापासून पूर्णपणे वेगळे व्हायचे आहे, त्यांना स्वातंत्र्य हवे आहे. तर सरकार त्यांना स्वायत्तता देण्यास तयार आहे. पण ॲचनीज नेते स्वातंत्र्याशिवाय काही मान्य करायला तयार नाहीत आणि शस्त्रेही खाली ठेवायला तयार नाहीत. शिवाय, त्यांना स्वीडनमधील त्यांच्या काही नेत्यांकडून भरपूर मदतही मिळते आहे. दुसरीकडे काही ॲचनीज नेत्यांनी थायलंड व कंबोडिया येथूनही शस्त्रखरेदी करणे चालू ठेवलेले आहे. अखेरीस मेगावती सरकारने तेथे लष्कराला पाठविले आहे. पण लष्कराला पाठवून हा प्रश्न सुटणारा नाही, असे पाश्चात्य देशातील लष्करविषयक अभ्यासक म्हणतात. इंडोनेशियाने तिमोरला स्वातंत्र्य दिल्याने हा प्रश्न आणखी उफाळला, असेही एक मत आहे. पण तिमोरचा प्रश्न वेगळा होता. इंडोनेशियाने तो आक्रमणाने

आपल्या अखत्यारीत आणला होता. ॲच हा पूर्वीपासूनच इंडोनेशियाचा एक भाग होता व आजही आहे. त्यामुळे त्याच्या बाबतीत स्वातंत्र्याचा प्रश्न उद्‌ भवत नाही, असे म्हटले जाते. तिमोरमधील नेत्यांनीही असेच मत व्यक्त केले आहे व आपण ॲचनीज लोकांना मदत करणार नाही, असे स्पष्ट केले आहे. ॲचनीज नागरिकांकडे त्यांच्या नेत्यांनी व इंडोनेशियाच्या सरकारने दुर्लक्ष केले, म्हणून त्यांना शस्त्रे हाती घेण्याची वेळ आली, असाही एक मतप्रवाह आहे. सध्यातरी या प्रश्नावरील तोडगा दृष्टिक्षेपात नसल्याने सरकार त्रस्त झाले आहे.

मेगावती सरकारने अमेरिकेला दहशतवादाविरूद्धच्या लढाईत पाठिंबा दिल्याने मुस्लिम समाजात थोडी नाराजी होतीच, पण बाली येथील बॉंबस्फोटामुळे त्यांच्या या पाठिंब्याचा विषय पुन्हा एकदा चर्चेत आला. इंडोनेशियाने इराक युद्धाला विरोध केला असला तरी मेगावती सरकार हे अमेरिकेकडे झुकणारे आहे, असे मत तेथे आहे. मुस्लिम कायदा मानणाऱ्या जस्टीस पार्टीने अलीकडेच अमेरिकेच्या दूतावासासमोर मोठ्या प्रमाणावर निदर्शने आयोजित केली होती. या पक्षाला १९९९ च्या निवडणुकांमध्ये कमी प्रमाणात मते मिळाली असली तरी इंडोनेशियात हळूहळू वाढत असलेला मुस्लिम मूलतत्ववाद ही तेथील राजकीय व धार्मिक समस्या आहे. जेमा इस्लामिया अशी एक संघटना तेथे कार्यरत आहे. फुटीरतावादी कारवाया करणारी अशी या संघटनेची ओळख सरकारला आहे. या संघटनेशी संबंधित अबू बकर बशीर या धर्मगुरूला अटक करण्यात आली असली तरी ही संघटना नोंदणीकृत नसल्याने ती कायद्याच्या भाषेत अस्तित्वात नाही. त्यामुळे सरकारला संघटनेवर व बशीरवर काही ठोस कारवाई करता येत नाही. बाली बॉंबस्फोटाशी या संघटनेचा संबंध असू शकतो, असे मत आहे आणि अबू बकर बशीरला मात्र सरकार पाडण्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली आहे. धार्मिक संघटनांनी पोसलेला दहशतवाद आपल्या देशात नाही असे यापूर्वी वारंवार म्हणणाऱ्या इंडोनेशियातील नेत्यांची आता अडचणीची स्थिती झाली आहे.

इस्लाम म्हणजे स्त्रियांची मुस्कटदाबी आणि दहशतवाद असे समीकरण जगभरात होत असतानाच इंडोनेशियातील मिनांगकबाऊ या खेड्याने मात्र आपली वेगळी परंपरा जपली आहे. येथे मातृसत्ताक पद्धती आहे आणि तरी तेथे अतिशय परंपरेने व श्रद्धेने इस्लाम धर्म पाळला जातो. येथे नवऱ्या मुलीबरोबर तिचा नवरा तिच्या आईकडे राहायला येतो. पुरुष व मुलगे हे आईच्या, बहिणींच्या संपत्तीत वाटा मागत नाहीत, उलट त्यांच्यापासून दूर राहतात. या संबंधात एका पाश्चात्य अभ्यासकाने ११ सप्टेंबरच्या

घटनेचा उल्लेख केला, तेव्हा या खेड्यातील लोकांनी 'आपला इस्लाम ' असे करणार नाहीच हे ठसून सांगितले. इस्लाम नेहमीच दुसऱ्याचा विचार करायला शिकवितो, असे त्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान इंडोनेशियाचा अंतर्गत नकाशा बदलण्याचा चंग सैफुल बहारी तांजुमबुलू या व्यक्तीने बांधला आहे. तशी चळवळ उभी करण्याचा प्रयत्न तो करीत आहे. छोटे छोटे प्रांत केल्याने लोकशाही सर्वांपर्यंत पोचण्यास मदत होते असे मत याला पाठिंबा देणाऱ्यांनी व्यक्त केले आहे. तर असे नवे छोटे भाग हे आर्थिकदृष्ट्या सक्षम राहू शकत नाहीत, असे टीकाकार म्हणतात.

मेगावती सरकारसमोर आणखी एक मोठा प्रश्न आहे तो म्हणजे आर्थिक उदारीकरणाचा. या प्रक्रियेत इंडोनेशियाला काही नुकसान सोसावे लागणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार जसजसा खुला होत जाईल तसतशी स्पर्धात्मकता वाढणार आहे, त्यामुळे मनुष्यबळाचा योग्य वापर, उत्पादनाचा दर्जा चांगला पण किंमती कमी अशी सगळी तारेवरची कसरत अनेक राष्ट्रांना करावी लागणार आहे. इंडोनेशियाही त्याला अपवाद ठरणार नसून यामुळे तेथील तयार कपड्यांचा व्यापार व पादत्राणांचा व्यापार अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मोठ्या व मध्यम गटातील अनेक कंपन्या डबघाईस येण्याचे प्रमाणही वाढले आहे. अनेक कंपन्यांनी आपला पसारा कमी करण्यासाठी काही पावले उचलली आहेत. त्यामुळेही औद्योगिक क्षेत्रात काळजीचे वातावरण आहे. चीन, कंबोडिया, बांगलादेश व पाकिस्तान येथून जर कमी किंमतीची उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आली तर इंडोनेशियाला त्यात वाटा मिळण्याची शक्यता कमी आहे. कारण येथील उत्पादनांची देशांतर्गत किंमत बरीच जास्त आहे. सरकारने व औद्योगिक क्षेत्राने वेळीच योग्य निर्णय घेतले तर देश फार वाईट परिस्थितीत जाणार नाही असे काही तज्ज्ञांचे मत आहे. इंडोनेशियातील भ्रष्टाचार व नोकरशाहीतील त्रास यांमुळे तेथे परकीय गुंतवणुकीचे प्रमाणही कमी झाले आहे. अशा काही आर्थिक सुधारणा करता-करता मेगावती सरकारला दहशतवाद व मुस्लिम मूलतत्ववाद यालाही वेसण घालायची आहे. २००४ मध्ये होणाऱ्या निवडणुकांसाठी तयारी करताना त्यांना मुस्लिम समाजाला नाराजही करता येणार नाही. त्यामुळे कदाचित पुढील निवडणुका मेगावती सरकारने जिंकल्या तरी त्यांना सरकारमध्ये मुस्लिम पक्षांना जास्त जागा द्याव्या लागतील अशी चिन्हे आहेत.

*(संदर्भ - एफ.ई.ई.आर., इंटरनेट )* ■■

# ईस्ट तिमोर

डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ ईस्ट तिमोर
राजधानी : डिली
शासन : लोकशाही प्रजासत्ताक
लोकसंख्या : ७ लाख ५० हजार
चलन : अमेरिकन डॉलर


विसाव्या शतकाच्या अखेरीला जगाच्या नकाशात ईस्ट तिमोर हे एक नवे राष्ट्र उदयाला आले. ईस्ट तिमोर बेट हे, एकीकडे इंडोनेशिया द्वीपकल्पाच्या जवळ पूर्वेकडे आणि दुसरीकडे ऑस्ट्रेलियाच्या उत्तर भागाच्या जवळ आहे. प्रथम येथे पोर्तुगीजांची वसाहत होती. १९७५ मध्ये इंडोनेशियाने आक्रमण करून येथे आपला अंमल स्थापन केला. तिमोरमधील नेत्यांनी व नागरिकांनी संयुक्त राष्ट्रसंघाची व जगातील इतरही राष्ट्रांची मदत घेऊन इंडोनेशियाच्या आक्रमणाविरूद्ध बंड पुकारले. अखेरीस १९९९ मध्ये त्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळाला. बहुसंख्य नागरिकांनी स्वतंत्र तिमोरच्या बाजूने मत दिले आणि विसावे शतक संपता संपता या देशाचा, अनेक वर्षांपासून इंडोनेशिया बरोबर चालू असलेला स्वातंत्र्यलढा संपला. त्याचे स्वतःचे अस्तित्व त्याला प्राप्त झाले. पण एकंदरीत, या लढ्यात खूप मोठ्या प्रमाणावर कत्तली झाल्या. यात हजारो तिमोरी नागरिक मारले गेले. हा रक्तरंजित लढा, त्यामागील कारणे व त्यामुळे निर्माण झालेले प्रश्न हे सध्या तेथे, राजकीय दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

'डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ ईस्ट तिमोर'च्या स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी व नोबेल पुरस्कार विजेते जोसे रामोस ओरता हे, या देशाच्या परराष्ट्र खात्याचे मंत्री आहेत. देशाच्या धोरणांबाबत त्यांची एक सविस्तर मुलाखत अलीकडेच प्रसिद्ध झाली. त्यातून या देशाच्या राजकीय व सामाजिक स्थितीबाबत काहीशी कल्पना येते.

तिमोरच्या स्वातंत्र्यलढ्यात तिमोरी नागरिकांचा फार मोठा वाटा आहे, यात शंका नाही. पण हा लढा एकट्या तिमोरी नागरिकांचा नव्हता. संयुक्त राष्ट्रसंघ व त्याचे महासचिव कोफी अन्नान यांनी याकामी खूप सहकार्य केले. पोर्तुगालनेही तिमोरला मदत केली आहे. तिमोरच्या या स्वातंत्र्यलढ्यात नागरिकांना ठार करणाऱ्या दोषी व्यक्तींविरूद्ध कारवाई करण्यासाठी राष्ट्रसंघाने योग्य पावले उचलली नाहीत असा आरोप राष्ट्रसंघावर केला जातो. पण हा आरोप ओरता यांना पूर्णपणे मान्य नाही. त्यांच्या मते राष्ट्रसंघाने मर्यादित साधने असतानाही या प्रश्नासंबंधी प्राथमिक पातळीवर

काही चौकशी केली. पण त्यावेळी राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेला यासाठी आतंरराष्ट्रीय लवाद नेमणे उचित वाटले नाही, ही त्रुटी मानता येईल. पण आता त्यासाठी 'सिरियस क्राईम युनिट' स्थापन करण्यात आले असून हे युनिट चांगले काम करीत आहे. याशिवाय तिमोरमधील शासनाने एक सत्यशोधन आयोगही स्थापन केला आहे. या दोहोंमध्ये फरक असा की, राष्ट्रसंघाचे युनिट आंतरराष्ट्रीय पातळीवर असून ते निष्पक्षपणे काम करताना मानवी हक्क, युद्धासंबंधीचे गंभीर गुन्हे किंवा वांशिक हत्या याची चौकशी करणार आहे. तर, तिमोर देशांतर्गत आयोग हा, तिमोरी नागरिकांवरील हिंसाचाराची पाळेमुळे (१९७४ पासूनची) निष्पक्षपणे शोधणार आहे.

इंडोनेशियात फुटीरतावादी चळवळी वाढल्या आहेत. अॅच (Aceh) आणि वेस्ट पापुआ (West Papua) या भागांतील नागरिक स्वतंत्रतेसाठी प्रयत्न करीत आहेत. (खालील नकाशा पाहावा) त्याबाबत जोसे रामोस ओरता यांनी आपल्या देशाची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणतात की, "आमचा देश फुटीरतावादी चळवळीला चळवळीला कधीच पाठिंबा देणार नाही कारण ते भाग इंडोनेशियाच्या अखत्यारीत आहेत. आशियातील कित्येक देशांसमोर असे प्रश्न आहेत. एकाला पाठिंबा दिला की




तिमोर हा देश व इंडोनेशियातील फुटीरतावादी कारवाया वाढलेले भाग

सर्वत्र तोच न्याय लागू करण्यांची मागणी पुढे येते, ती आशियातील स्थैर्यासाठी घातक ठरू शकेल. इंडोनेशियाबरोबरचे आमचे संबंध धोक्यात येतील किंवा पाठिंबा दिल्याने आम्हाला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी कारणे या भूमिकेमागे नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. इंडोनेशियाच्या सरकारसमोर विखुरलेल्या छोट्या बेटांवर लोकशाहीची मूल्ये प्रस्थापित करण्याचे मोठे आव्हान आहे. पन्नास वर्षे स्थिरावलेली हुकुमशाही, एकाधिकार व भ्रष्टाचार मोडून काढणे हे सोपे काम नाही. त्यातच आर्थिक

प्रश्न गंभीर होत आहेत. त्यामुळेही नागरिकांच्या भावनांचा उद्रेक होतो आहे. सरकारने फुटीरतावादी लोकांची मानसिकता समजून घेऊन, ते का असमाधानी आहेत हे शोधले पाहिजे. त्यांचे असमाधान दूर करणे व त्यांना इंडोनेशियाशी जोडून ठेवणे, असे काम इंडोनेशियाच्या सरकारला करायचे आहे. छळाच्या व बळाच्या जोरावर हे काम केले तर त्याचे परिणाम वाईट होतील. त्यामुळे शांततेच्या मार्गानेच हा प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. त्यांचे हे काम कठीण असून त्यांच्याप्रती आपल्या देशाला सहानुभूती वाटते."

'ईस्ट तिमोर'ने 'एसिआन'मध्ये (ASEAN) सहभागी व्हावे किंवा कसे याबाबत ईस्ट तिमोरचे उत्तर होकारार्थी आहे. हा देश भौगोलिकदृष्टया आशियाच्या जवळचा देश आहे. मात्र, वांशिकदृष्ट्या येथील नागरिक व त्यांची संस्कृती पॅसिफिक बेटांवरील नागरिकांशी मिळती-जुळती आहे. येथे प्रामुख्याने, मेलानेशियन (पॅसिफिक बेटांवरील नागरिकांशी जवळीक साधणारे) आणि मले -पोलिनेशियन (आशियाशी जवळीक साधणारे) असे दोन वंशांचे नागरिक राहतात. 'ईस्ट तिमोर'ने 'एसिआन'मध्ये सहभागी होणे हे उभयपक्षी फायद्याचे ठरेल आणि यासाठी आपल्या देशाला काही कायदेशीर बाबींची पूर्तता करावी लागणार आहे, असे ओरता म्हणतात.

आर्थिकदृष्ट्या समर्थ होण्यासाठी ईस्ट तिमोरने काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. तिमोरच्या समुद्रातील तेल मिळवून तेलाचा व्यापार सुरू करण्यासाठी तिमोर व ऑस्ट्रेलिया यांच्यात करार झाला आहे. पण केवळ तेलाच्या व्यापारावरच देशाची अर्थव्यवस्था उभी करण्याचे उद्दिष्ट नाही. शेती, मच्छिमारी व संबंधित उद्योग आणि पर्यटन यांकडेही विशेष लक्ष देण्यात येणार आहे. तसेच शिक्षणाच्या व रोजगाराच्या संधी वाढविणे, नागरिकांमधील वेगवेगळी कौशल्ये वाढविणे अशा काही योजना राबविण्याचा सरकारचा प्रयत्न असेल. परकीय गुंतवणूक वाढून उद्योजकताविकासाच्या योजनाही येथे आखण्यात येणार आहेत.

आंतरराष्ट्रीय संबंधांचा विचार करताना ओरता यांच्या सरकारची भूमिका अशी आहे की संयुक्त राष्ट्रसंघासारख्या संस्था आणखी बळकट व्हायला हव्यात. दहशतवाद, जागतिकीकरणामुळे निर्माण होणारे प्रश्न, तसेच गरिबी व पर्यावरण इत्यादी विषय राष्ट्रसंघाच्यामार्फत सोडविणे शक्य होऊ शकते, मात्र राष्ट्रसंघातही काही सुधारणा होणे ईस्ट तिमोरला अपेक्षित आहे.

*(संदर्भ - इंटरनेट)*

■■

# फिलिपीन्स

रिपब्लिक ऑफ फिलिपीन्स
राजधानी : मनिला
शासन : रिपब्लिक
लोकसंख्या : ८ कोटी ३० लाख
चलन : पेसो

सात हजार सात बेटांचा समूह असलेला आणि आठ कोटी लोकसंख्या असलेला, फिलिपीन्स हा अतिपूर्वेकडील देश आहे.

स्पेनच्या स्पॅनिश मिलिटरी पार्टीने या बेटांना १५६५ साली आपल्या अंमलाखाली आणले आणि तत्कालीन प्रिन्स फिलिप (नंतर किंग फिलीप दुसरा) याच्या नावाने 'फिलिपीन्स' असे नाव बेटांच्या या समूहास दिले. तेव्हापासून हा प्रदेश स्पॅनिश साम्राज्याचा एक भाग म्हणूनच १८९८ सालापर्यंत होता. आशियातील इतर अनेक देशांप्रमाणेच येथेही साम्राज्याविरूद्ध लढा देणाऱ्या चळवळी १९ व्या शतकात निर्माण झाल्या. या राष्ट्रीय चळवळींमुळे नि कातिपुनन बंडाच्या विशेष जोरामुळे १८९८ मध्ये फिलिपीन्स स्पॅनिश साम्राज्यातून मुक्त झाला. मात्र याचवेळी, स्पेनविरूद्ध लढण्यासाठी अमेरिकेची मदत घेतल्याने (स्पॅनिश-अमेरिकन युद्ध : १८९८-१९०१) हा देश अमेरिकेची वसाहत म्हणून ओळखला जाऊ लागला. १९०१ पासून १९४१ पर्यंत फिलिपीन्स प्रजासत्ताक संघ हा प्रामुख्याने अमेरिकन वर्चस्वाखालीच होता. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मात्र या देशावर अल्पकाल जपानची सत्ता प्रस्थापित झाली होती. अर्थात, युद्धसमाप्तीनंतर १९४६ साली खऱ्या अर्थाने फिलिपीन्स प्रजासत्ताक अस्तित्वात आले. परकीय दास्यातून पूर्णतः मुक्तता झाली, तरीही १९६६ ते १९८६ हा काळ फिलिपीन्समध्ये हुकुमशाहीचाच काळ होता. १९८६ ला मार्कोसची हुकुमशाही सत्ता उलथवून कोरॅझन ॲक्विनो या पोलादी बाईने पिलिपीन्समध्ये लोकशाहीची पुनर्स्थापना केली. आणि केवळ पाच वर्षांच्या अवधीमध्ये राज्यव्यवस्थेला पूर्णतः लोकशाही वळण देऊन, १९९२ च्या निवडणुकीत आपल्याच मंत्रिमंडळातील संरक्षणमंत्री फिडेल रामोस यांच्याकडे रीतसर सत्ता सोपविली.

आज फिलिपीन्सची लोकसंख्या सुमारे आठ कोटी असून जन्मदर खूपच मोठा म्हणजे दरहजारी २७.३७ एवढा आहे. मृत्युदर मात्र इतर अनेक देशांप्रमाणे, गेल्या अर्धशतकात खूपच खाली म्हणजे ६.०४ वर आला आहे. त्यामुळे लोकसंख्यावाढीची

समस्या ही फिलिपीन्समधील एक महत्त्वाची समस्या आहे. अनेक धर्म व वंशाचे लोक येथे असले तरी ख्रिश्चन मले वंशाच्या लोकांचे प्राबल्य आहे. (९१.५ टक्के) या व्यतिरिक्त मुस्लिम मले, चिनी आणि इतरही वंशाचे लोक आहेत. बहुसंख्य लोक ख्रिश्चन धर्माचे असून त्यात रोमन कॅथॉलिक (८३ टक्के) व प्रोटेस्टंट पंथाचे (९ टक्के) लोक आहेत.

आर्थिकदृष्ट्या मात्र फिलिपीन्स अजूनही विकसनशील आहे. शेती व आनुषंगिक व्यवसाय हे प्रमुख असून सुमारे ४० टक्के लोक यांवर निर्वाह करतात. तरीही शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा केवळ २० टक्के इतकाच आहे. दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या ४१ टक्के असून आर्थिक विषमताही तीव्र आहे. लोकसंख्येच्या उत्पन्नानुसार असलेल्या उतरंडीमध्ये उच्च उत्पन्नाच्या १० टक्के लोकांकडे उपभोगातील ४० टक्के वाटा जातो, तर अगदी गरीब १० टक्के लोकसंख्येला केवळ १.५ टक्का एवढाच उपभोगाचा वाटा प्राप्त होतो. मुख्यतः तांदूळ, फळे, मासे व मांस आणि कपडे निर्यात करणारा हा देश आहे. अलीकडे मात्र इलेक्ट्रिकचे सामान, यंत्रसामग्री आणि वाहतूकसामग्रीही मोठ्याा प्रमाणात निर्यात केली जाते.

ग्रामीण विकास हा इथला प्रमुख आर्थिक -सामाजिक स्वरूपाचा प्रश्न आहे. ग्रामीण भाग आणि शहरी भाग यांमधील आर्थिक व इतर सुखसोयींमधील दरी खूपच मोठी आहे. ग्रामीण भागातील कुटुंबाचे सरासरी उत्पन्न शहरी भागातील कुटुंबाच्या जवळजवळ निम्मे आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाच्या संदर्भात अनेक स्वेच्छाकार्य संस्था कार्यरत आहेत; ग्रामीण सुधारणेबाबतची अनेक प्रतिमाने मांडली जातात, वापरली जातात. जेम्स येन या मूळ चिनी माणसाचे फिलिपीन्समधील ग्रामीण विकासाचे अर्धशतकाचे कार्य व प्रतिमानही प्रसिद्ध आहे.

फिलिपीन्समध्ये अलीकडे तीव्र होत चाललेला एक प्रश्न आहे बेकारीचा. बेकारीचे प्रमाण सुमारे १० टक्के एवढे आहे. म्हणजे एक कोटीच्या आसपास ही संख्या आहे. शिवाय सुमारे ५५ लाख लोक अर्धबेकार आहेत. गेल्या दहा-पंधरा वर्षांमध्ये अत्याधुनिक अशा दळणवळणाच्या आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विकासाने नवीन तंत्रज्ञान व कौशल्ये प्राप्त असणाऱ्या वर्गाची गरज भासू लागली आहे. याचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर झाला आहे. सर्वच उत्पादनक्षेत्रांचा बाज बदलत चालला आहे. त्यामुळे नवीन तंत्रज्ञान व तंत्रकौशल्य असलेला शिक्षित वर्ग गरजेचा झाला आहे. आणि याबाबतीत फिलिपीन्सला अनेक अडचणींशी मुकाबला करावा लागत आहे. येथील

शिक्षणात परिवर्तनाची निर्माण झालेली गरज, शिक्षणसंस्था भागवू शकत नाहीत. सरकारने शिक्षणविषयक अनेक नवीन धोरणे आखली, योजना कार्यान्वित केल्या आहेत. तरीही अजून हायस्कूलमध्ये जाणाऱ्यांचे प्रमाण (त्या वयाच्या एकूण मुलांमध्ये) फक्त ६५ टक्क्यांच्या आसपासच आहे. गळतीचे प्रमाणही मोठे आहे, आणि ते वाढत चालले आहे. १९८८ ते १९९८ या दहा वर्षांत ते ६ वरून १३ टक्क्यांवर गेले आहे. सुमारे २५ ते ३० टक्के मुले हायस्कूलचे शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत, असेही एक अभ्यास सांगतो. तर, मुलांना पुरेशी क्रमिक पुस्तके पुरविली जात नाहीत, एकाच पुस्तकावर अनेक मुलांना अभ्यास करावा लागतो अशीही वेळ येते, असे दुसऱ्या एका अभ्यासाने दर्शविले आहे. सरकारचा शिक्षणावरील खर्च कमी होत चालल्याचे हे द्योतक आहे. किंबहुना शिक्षणाच्या घसरत्या दर्जाचा संबंध सरकारच्या शिक्षणावरील घटणाऱ्या खर्चाशी जोडला जातो.

दिवसेंदिवस शिक्षकांची संख्या वाढते आहे. पण, त्याहीपेक्षा विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तरही मोठे आहे. काही ठिकाणी वर्गात, ७० पेक्षाही जास्त मुले आहेत. तर काही ठिकाणी मुलांना शाळेत पोचण्यासाठी ३ ते ७ कि.मी. अंतर चालून जावे लागते. सर्वांना एकच शिक्षण हे बऱ्याचदा ग्रामीण मुलांच्या बाबतीत जीवन आणि शिक्षण यांत फारकत करीत आहे. शिक्षण व्यवसायाभिमुख तर नाहीच. त्यातच आता, नव्या युगाच्या नवतंत्रज्ञानाच्या व्यावसायिक स्वरूपाला हे शिक्षण कुठे भिडतच नाही. त्यामुळे फिलिपीन्सच्या फिलिपीनो तरूणांच्या विकासाच्या गरजा भागविण्यात शिक्षण अपयशी ठरत आहे, अशी भावना सार्वत्रिक होत आहे; रोजगारविषयक अनेक प्रश्नांना युवकांना तोंड द्यावे लागत आहे.

अनेक विकसनशील राष्ट्रांप्रमाणेच फिलिपीन्समध्येही श्रमशक्तीत युवकांचा भरणा अधिक आहे. १५-२४ या वयोगटातील ६० टक्के युवक त्यात समाविष्ट आहेत. रोजगारात प्रवेश करणाऱ्या युवकांची येथील परिस्थितीही फारशी समाधानकारक नाही. फिलिपीन्समध्ये किमान वेतनाचे कायदे अस्तित्वात आहेत. तरीही अनेकांना किमान वेतनापेक्षा कमी वेतनावर काम करावे लागते. ग्रामीण युवकांना हा प्रश्न अधिक भेडसावतो. परिणाम असा होतो की अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी त्यांना अधिक काम करावे लागते किंवा काही जोडधंदा शोधावा लागतो. गरिबीत राहणाऱ्यांची स्थिती यामुळे गरीबच राहते. सामाजिक सुरक्षिततेच्या सोयींपासूनही अनेक युवक वंचित आहेत. जेमतेम १३ ते १४ टक्के युवकांना अशा सोयींचा कायदेशीर लाभ

मिळतो. १९९५ साली केलेल्या एका सर्वेक्षणानुसार कपडे, पादत्राणे आणि हस्तोद्योगाच्या उद्योगांमधून मोठ्या संख्येने अल्पवयीन मुले कामावर आहेत. १५ ते १७ वयातील मुलेही खूप आहेत आणि रोज आठ तासांपेक्षा जास्त वेळ काम करूनही त्यांना पुरेसे वेतन प्राप्त होत नाही.

ग्रामीण भागांतून पसरत चाललेल्या रासायनिक उद्योगांतून तर अशा अल्पवयीन मुलांना धोक्याच्या नि अनारोग्याच्या वातावरणात कामे करावी लागतात. युनिसेफच्या अहवालानुसार फिलिपीन्समध्ये बालकांच्या कुपोषणाचा प्रश्नही खूप मोठा आहे. त्याचबरोबर वाढत्या प्रमाणावरील मादक द्रव्यांची व्यसनाधीनता आणि एड्ससारख्या रोगांचा प्रादुर्भाव हेही प्रश्न फिलिपीन्सच्या अल्पवयीन मुले व युवकांसमोर उभे आहेत. व्यसनाधीन लोकांची संख्या वीस लाखावर गेली आहे तर एड्सच्या रुग्णांची अठ्ठावीस हजारावर.

या सर्व परिस्थितीचा परिणाम, अर्थातच, एकूण गरिबीवर होत आहे. बेकारी निर्मूलनाचे अनेक उपाय योजूनही, दारिद्र्य रेषेखालील गरिबांचे प्रमाण १९९७ साली ३७ टक्के होते ते २००१ साली ४१ टक्क्यांवर गेले आहे. अर्थात, हे प्रमाण मोजताना दरडोई किमान वार्षिक उत्पन्न बारा हजार पेसो इतके धरले आहे. त्याच्यापेक्षा थोडेसे जास्त उत्पन्न असलेले नागरिक या व्याख्येत बसत नसले तरी प्रत्यक्षात त्यांची स्थितीही गरिबीचीच आहे. 'पॉप्युलेशन कमिशन'चे कार्यकारी संचालक टॉमस ओशिया यांनी म्हटले आहे, "गरिबी हे केवळ संख्याशास्त्रातील मोजमाप नाही. ही अशी स्थिती आहे की ज्यामुळे लोकांची प्रतिष्ठाच त्याने हिरावून घेतली जाते. आणि पिढ्यान्‌पिढ्यांच्या भावी कालातील जीवनसुधारणेच्या आशाच नष्ट होतात." *(संदर्भ - इंटरनेट )*

"अशिया हा आता आर्थिक नि सामाजिक परिवर्तनाच्या शीवेवर उभा आहे. आशियाई जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक अंगामध्ये विलक्षण वेगाने बदल होत चालला आहे. लोक आता अधिक संपन्न, अधिक सुदृढ, अधिक शिक्षित होत आहेत. अधिक चांगले अन्नही मिळवीत आहेत; आणि हे सारे अगदी अल्पकाळात. पण, हे लाभ सर्वच आशियाईंना समानतेने मिळालेले नाहीत. काही देश, देशांमधील काही प्रदेश, प्रदेशांमधील काही समाजगट अजूनही कितीतरी मागे आहेत. शिवाय गेल्या तीस वर्षांत आशिया हा वाढत्या प्रमाणात प्रदूषित नि पर्यावरण ऱ्हास झालेला असा आहे." - 'इमर्जिंग एशिया : चेंजेस अँड चॅलेंजेस अँन एशियन डिव्हलपमेंट बँक पब्लिकेशन्स' (१९९७)

# चीन व हाँगकाँग

पीपल्स रिपब्लिक ऑफ चीन
राजधानी : बीजिंग
शासन : साम्यवादी प्रशासन
लोकसंख्या : १.३ अब्ज
चलन : युवान
हाँगकाँग : चीनचा विशेष प्रशासकीय विभाग

आशियातील महाशक्ती असा ज्याचा उल्लेख करता येईल तो चीनसध्या जागतिक व्यापारात सहभागी होण्याचा व त्याचे फायदे मिळवून घेण्याच्या प्रयत्नात आहे. यासंदर्भातील चीनमधील आर्थिक, सामाजिक व औद्योगिक अशा विविध घडामोडींबाबत अर्थबोधपत्रिकेत यापूर्वीही काही लेख प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यामुळे चीनबद्दल काही वेगळी माहिती या विशेषांकांच्या निमित्ताने पुढे आणली आहे. साम्यवादात अडकलेल्या चीनमधील नव्या धोरणांचे परिणाम तेथील समाजजीवनावर व अर्थव्यवस्थेवर कसे होतील, याचा अभ्यास अनेक तज्ज्ञ मंडळी करीत आहेत. चीनमधील 'ब्रेनड्रेन'या सामाजिक प्रश्नाबाबत असा एक अभ्यास अलीकडेच डेव्हिड वेग आणि स्टॅनली रोसेन यांनी केला आहे. भारतातही 'ब्रेनड्रेन'ची चर्चा नेहमीच असते. त्यामुळे हा अभ्यास भारताच्या पार्श्वभूमीवरही ताडून पाहता येईल.

चीनमधील विज्ञान व संशोधनक्षेत्र अधिक प्रगत करण्यासाठी चीनमधील एक ज्येष्ठ नेते डेंग झियोपिंग यांनी १९७८ मध्ये एक नवीन योजना आखली. चीनमधील किमान तीन हजार तरूण संशोधकांना दरवर्षी उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठवायचे. ते मायदेशी परतल्यानंतर त्यांचा चीनला होणारा उपयोग हा देशाला प्रगतीपथावर नेणारा ठरेल असे त्यांते मत होते. यातील पाच टक्के युवा संशोधक मायदेशी परतले नाहीत तरी या योजनेमुळे चीनचा फायदाच होईल, असे उत्तर त्यांनी आपल्या टीकाकारांना दिलेही होते. पण चीनमध्ये १९६६ ते १९७६ या काळात झालेल्या क्रांतीच्या पार्श्वभूमीवर त्यांना ही योजना राबविता आली नाही. पाश्चात्य देशांमधील परिस्थितीचा डेंग यांना अंदाज नव्हता, असे आता म्हणता येईल. कारण १९७८ पासून परदेशी गेलेल्या चिनी नागरिकांपैकी फक्त ३२ टक्के नागरिक १९९७ पर्यंत मायदेशी परतले होते. त्यातही जे परत आले ते सरकारने दिलेल्या शिष्यवृत्यांमुळे परदेशी जाऊ शकले होते. जे स्वखर्चाने उच्च शिक्षणासाठी परदेशी गेले, त्यांचे मायदेशी परत येण्याचे प्रमाण फक्त

३.९ टक्के एवढे अल्प होते. चीनमधील अनेक विद्यापीठे व चायनीज ॲकॅडमी ऑफ सायन्सेस सारख्या मान्यवर संस्थाही या संशोधकांना आकर्षित करू शकल्या नव्हत्या. १९८५ ते १९९९ या काळात परदेशी गेलेल्यांपैकी दोन-तृतीयांश संशोधकविद्यार्थी मायदेशी परतलेले नव्हते, अशी आकडेवारी चायनीज स्टॅटिस्टिकल इयरबुकने (२०००) प्रसिद्ध केली होती.

चीनमध्ये ब्रेनड्रेनचा प्रश्न १९८० च्या दशकात जाणवू लागल। तेव्हा चीनमधील धोरणकर्त्यांमध्येच यासंबंधी दोन गट पडले होते. चीनमधील शिक्षण खात्यातील एका माजी अधिकाऱ्याच्या मते, या विद्यार्थ्यांनी चीनमध्ये परत यावे असे फक्त शिक्षण खात्याचे मत होते. बहुतांश संस्थांना या युवकांनी लगेच चीनमध्ये परत येऊ नये असेच मत व्यक्त केले होते. मनुष्यबळखात्याचे मत असे होते की, जर अनेक विद्यार्थी मायदेशी परतले तर त्या सर्वांना नोकऱ्यांमध्ये सामावून घेता येणार नाही आणि विनाकारण देशांतर्गत स्पर्धा वाढेल. सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञानखात्याचे म्हणणे होते की मायदेशी परतण्यापेक्षा या विद्यार्थ्यांनी परदेशांत नोकरी करून नवीन ज्ञान मिळवावे, ते वाढवावे, आणि तिकडचे नवतंत्रज्ञान चीनला कसे मिळू शकेल याकामी मदत करावी. सरकारच्या परदेशविषयक कामकाज खात्याला असे वाटत होते की, चीनचे जास्तीत जास्त तरूण परदेशांत राहिले तर पश्चिमेकडे चीनचा दबदबा निर्माण होऊ शकेल. चीनमधील साम्यवादी पक्षाचे एक ज्येष्ठ नेते झाओ झियांग यांनी म्हटले होते की, 'परदेशांत चीनची बौद्धिक शक्ती साठविणे हे दूरदृष्टीचे ठरेल.'

चीनमधील ब्रेनड्रेनमागे आर्थिक कारणेही आहेत. चीनमधील विद्यापीठांकडे व संस्थांकडे संशोधनासाठी व उच्च शिक्षणासाठी मोठा निधी नव्हता. त्यामुळे परदेशांकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्तींवर चीनमधील तरूणांचे ज्ञान वाढणे हे तेव्हा गरजेचे झाले होते. याशिवाय, जे संशोधक चीनमध्ये परत येऊ इच्छित होते त्यांना परदेशांतील सर्व प्रकारच्या सोयीसुविधा (राहण्याच्या व नोकरीसंदर्भातील) देण्याची चीनची तयारी झालेली नव्हती. चीनमधील तियानमेन चौकात झालेली घटना आणि राजकीय अस्थिरता ही देखील कारणे या नवसंशोधकांना परदेशांत राहण्याला प्रोत्साहन देणारी ठरली.

पण या शतकाच्या सुरूवातीला मात्र या परिस्थितीत थोडा बदल झालेला दिसतो आहे. यासाठी चीनमधील काही नवीन धोरणे कारणीभूत ठरली आहेत. एक म्हणजे, चीनमध्ये जे नागरिक परत येतील, त्यांना चीनमध्ये वास्तव्य करणे काही कारणाने योग्य वाटले नाही तर त्यांना पुन्हा परदेशी जाण्याची संधी देण्यात येईल. दुसरे

म्हणजे त्यांना चीनमध्ये मिळणारे वेतन हे परदेशांत मिळणाऱ्या वेतनाचा तुलनात्मक विचार करून पूर्वीपेक्षा अधिक देण्यात येईल. तिसरे म्हणजे, त्यांच्या कुटुंबासह राहण्यासाठी त्यांना मोठी घरे सरकारी खर्चाने उपलब्ध करून देण्यात येतील.

याशिवाय, परदेशी राहून चीनला प्रगतीपतावर नेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी चीनमध्ये विविध क्षेत्रांत गुंतवणूक करावी, नवीन उद्योगधंदे उभारावेत, शैक्षणिक कार्य करावे, आपल्या ज्ञानाचा हरप्रकारचा फायदा चीनमधील समाजाला करून द्यावा असे त्यांना सुचविण्यात आले. चीनने या अनिवासी चिनी नागरिकांना मायदेशाशी बांधून ठेवण्याचा प्रयत्न केला. ते चीनमध्ये परत आले नाहीत, म्हणून त्यांच्यावर टीका करण्यात येत होती, तिला विराम दिला. मायदेशात गुंतवणूक करणाऱ्या नागरिकांसाठी करसवलती व तत्सम उपाययोजनाही राबविण्याचा प्रयत्न करण्यात आला. 'परदेशांत राहून मायदेशाची सेवा करून देशभक्त व्हा,' अशी ही योजना परदेशांतील चिनी नागरिकांमध्ये लोकप्रिय झाली. या योजनेचा चीनला फायदाही झाला कारण, परदेशी असणाऱ्या चिनी नागरिकांची संख्याही मोठी आहे. अमेरिकेत अंदाजे सव्वा लाख आणि जपानमध्ये सुमारे चाळीस हजार चिनी विद्यार्थी-नागरिक आहेत.

चीनने जागतिक व्यापार संघटनेत सहभागी होऊन या सर्व योजनांना गती येईल याचाही प्रयत्न केला. सार्वजनिक क्षेत्रांतील गुंतवणुकीचे महत्त्व कमी करून खाजगी कंपन्या सुरू करण्याला चीनने प्रोत्साहन दिले. चीनमध्ये नवतंत्रज्ञान आणणाऱ्या परदेशांतील कंपन्याना नवीन कार्यालये सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले व्यवहार सुरळित पार पडतील याची व्यवस्था केली. चीनमध्ये राहून परदेशी कंपन्यांमध्ये काम करायला मिळेल म्हणूनही अनेक नागरिक चीनमध्ये परत आले. संगणक क्षेत्रातील प्रसिद्ध असलेल्या मायक्रोसॉफ्ट, इंटेल, ओरॅकल व इतर काही बहुराष्ट्रीय कंपन्यांची सुसज्ज कार्यालये आज चीनसाठी या दृष्टीनेही महत्त्वाची ठरली आहेत.

जागतिक बाजारपेठेत सहभागी होण्यासाठी व परकीय गुंतवणूक वाढविण्यासाठी चीनला आज वित्त, विपणन, जाहिरात, कायदेविषयक व इतरही अनेक विषयांतील तज्ज्ञांची गरज भासते आहे. यासाठी चीनमधील तरूणांनी असे विविध प्रकारचे शिक्षण परदेशांत वा चीनमध्ये घ्यावे, यासाठी आता चीन प्रयत्नशील आहे. पण एक गोष्ट खरी आहे की, कोणतेही उपाय चीनमधील सरकारने केले तरी लोकशाहीकडे वाटचाल होण्याची अपेक्षा अनिवासी चिनी नागरिकांच्या मनात आहे व ती पूर्ण होण्याकडे त्यांची नजर आहे.

*(संदर्भ - इंटरनेट)*

# हाँगकाँग

हाँगकाँग हे चीनच्या जवळचे एक छोटेसे बेट. विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत, म्हणजे सुमारे ९९ वर्षे ब्रिटिशांचा अंमल असलेले. कारण, ब्रिटिशांचा साम्राज्यवाद पूर्वेच्या या टोकापर्यंत पोचला होता. शेवटी विसाव्या शतकाच्या अखेरीला ब्रिटिशांनी आपले वर्चस्व सोडले; आणि हाँगकाँग चीनचा 'विशेष प्रशासकीय भाग' म्हणून ओळखले जाऊ लागले. हाँगकाँग भौगोलिक व सांस्कृतिकदृष्ट्या चीनला खूपच जवळचे आहे. ब्रिटिशांच्या अंमलामुळे ख्रिश्चन धर्म व चीनमधील बौद्ध धर्म, कन्फ्युशियानिझम व ताओइझम यांचा येथे प्रभाव आहे. पूर्व व पश्चिम यांचा एक वेगळा संगम येथील समाजजीवनात बघायला मिळतो. येथील नागरिकांना, मात्र, आपण हाँगकाँगचे नागरिक आहोत, असे सांगायला आवडते.

हाँगकाँग हे शहर आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी जगभरात प्रसिद्ध आहे. येथील व्यापार हा मुळात 'लघुउद्योग' या गटात मोडणारा असून कुटुंबातील अनेक घटक या अर्थकारणात जोडलेले असतात. येथे व्यापार करून पैसा कमविणे याला महत्त्व असून जो तो आपल्या उपजीविकेसाठी सदा धावत असतो. त्यामुळे संपन्नता बरीच आढळते. उंच इमारती आणि आरामदायी मोटारी यांच्या गर्दीतही येथे सायकलस्वार आढळतात. पश्चिमेच्या कलाकुसरीच्या वस्तूंपासून नवतंत्रज्ञानयुक्त उपकरणांपर्यंत अनेक ग्राहकोपयोगी वस्तू येथे खच्चून भरलेल्या असतात. त्यामुळे आपले विक्रीकौशल्य पणाला लावून येथील नागरिक आपल्या वस्तू खपवीत असतात. येथील माणसे व्यापारासाठीच घडलेली आहेत की काय, असे त्यांच्या वागणुकीवरून व येथील समाजजीवनावरून वाटते. हाँगकाँगमधील नागरिकांचा राहणीमानाचा दर्जाही चांगला आहे. येथे दर सहा मोटारींमागे एक महागडी आरामदायी मोटार रस्त्यावरून धावताना दिसते, यावरून येथील श्रीमंतीची कल्पना स्पष्ट व्हावी. अशी प्रतिष्ठा येथील समाजजीवनात महत्त्वाची आहे. अनेक वस्तूंची नकली बाजारपेठ येथे आहे, हजारो डॉलर्स खर्च करता येतील अशी आरोग्यदायक सौंदर्यकेंद्रेही आहेत. 'एक खर्चिक व्यापारी केंद्र' अशी हाँगकाँगची ख्याती आहे. या सर्वांबरोबर येथील समाज, परंपरा जपणाराही आहे. चीनच्या व पश्चिमेच्या संस्कृतीची येथे सरमिसळ झाली असली तरी मुळात चीनमधील फेंग शुई आणि इतर रूढी व परंपरा येथे कसोशीने जपल्या जातात. एकीकडे टोकाची आधुनिकता व दुसरीकडे अत्यंत जुन्या परंपरा असे चित्र येथे आढळते.

हाँगकाँग हा सध्या चीनच्या अखत्यारीत असला तरी हाँगकाँगला स्वत:चे अस्तित्व जपायचे आहे. त्यामुळे तेथील समाजातील सध्याची महत्त्वाची घटना म्हणजे, चीनबरोबरच्या राजकीय घडामोडी होय. हाँगकाँगमध्ये सुरक्षाविषयक नवीन कायदा लागू करण्यावरून फार मोठे वाद झाले. अलीकडेच (जुलै २००३) लाखो नागरिकांनी या कायद्याच्या विरोधात निदर्शने केली. त्यामुळे या कायद्याभोवती सध्या सगळे राजकारण केंद्रित झाले आहे. हा कायदा केवळ राजकारणाशी संबंधित नाही, तर तेथील समाजजीवनावर मोठा परिणाम करणारा आहे. म्हणून लाखो लोक याच्या विरोधात उभे ठाकले आहेत. हा कायदा व त्यासंबंधीचे राजकारण हे पूर्व आशियासाठी व विशेषकरून चीन-हाँगकाँगसाठी फार महत्त्वाचे आहे. हाँगकाँगचा प्रशासकीय कारभार हाँगकाँगच्या नागरिकांच्या हातात असला तरी उच्च अधिकारी हे चीनधार्जिणे असतात. (चीनच्या नेत्यांची मान्यता असणाऱ्यांनाच येथील राजकारणात पुढे जाता येते.) हाँगकाँगचे सध्याचे मुख्य प्रशासकीय अधिकारी टंग ची वा आणि त्यांचे सहकारी हे सध्या यात टीकेचे मानकरी ठरले आहेत.

नवीन सुरक्षाविषयक कायद्यामुळे हाँगकाँगच्या नागरिकांचे सार्वभौमत्व धोक्यात येईल, असे येथील नागरिकांना वाटते आहे. म्हणजे अंतर्गत सुरक्षिततेच्या कारणावरून हाँगकाँगमधील कोणत्याही संघटनेवर, छोट्या गटांवर बंदी येऊ शकेल. याशिवाय पोलिसांचे अधिकार वाढून त्यांना अनेकांची झडती घेणे वा कायद्याच्या कचाट्यात अडकविणे सोपे जाणार आहे. प्रत्यक्षात जे गट हाँगकाँगला त्रासदायक नसतील, पण चीनला राजकीयदृष्टीने अडचणीचे ठरतील असे गट प्रामुख्याने या कायद्याच्या कचाट्यात अडकतील. उदाहरणार्थ, हाँगकाँगमधे लोकशाही असावी, असे तेथील बहुतांश नागरिकांना वाटते. पण चीनमध्ये साम्यवादी राजवट असल्याने त्यांना असे लोकशाही समर्थक गट अडचणीचे ठरू शकतात. म्हणून हा नवा कायदा चीनच्या फायद्याचा व हाँगकाँगच्या नुकसानीचा ठरू शकतो. या कायद्याला विरोध करण्यामागे आणखीही काही महत्त्वाची कारणे आहेत. ती म्हणजे सध्याचे प्रशासकीय अधिकारी टंग ची वा हे येथील विस्कटलेली आर्थिक घडी नीट करण्यात व सार्स या रोगासंबंधी झालेल्या घडामोडी योग्य रीतीने हाताळण्यात अयशस्वी ठरले आहेत, असे नागरिकांना वाटते. याशिवाय नागरिकांना लोकशाहीची स्थापना करायची आहे व त्यात वा नागरिकांच्या बाजूने नाहीत आणि चीनलाही सध्या लोकशाही नको आहे. त्यामुळे येथील वातावरण पूर्व आशियातील राजकीयदृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते आहे. *(संदर्भ - इंटरनेट)* ■■

# जपान

| |
|---|
| जपान<br>राजधानी : टोकियो<br>शासन : राजा असलेले घटनात्मक शासन<br>लोकसंख्या : १३ कोटी<br>चलन : येन |

जपान हा एक अत्यंत प्रगत देश म्हणून ओळखला जातो. जपानमधील तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि संशोधन हे जगात अनेकदा वाखाणले गेले आहे. जपानी नागरिकांमधील व्यवस्थितपणा, शिस्तबद्धता, विनम्रता अशा अनेक गुणांची चर्चाही कुठेकुठे होत असते. जपानमध्ये शिक्षणाला फार महत्त्व असून शिक्षित नागरिक हे या देशाचे भूषण आहे. एकंदरीतच शिक्षण क्षेत्रात आघाडीवर असलेल्या या देशात शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्या असू शकते व ती गेल्या काही वर्षांत वाढली आहे, ही आश्चर्याची तसेच काळजीची बाब आहे. १९९८ मध्ये शाळेत जाण्याचे नाकारणाऱ्या मुलांची संख्या सव्वा लाखापर्यंत पोचली होती. गेल्या वीस वर्षांच्या तुलनेत ही बारा पट वाढलेली होती. जपानमध्ये प्राथमिक शिक्षण (शालेय शिक्षणातील ९ वर्षे) सक्तीचे आहे. शाळेत जाणे नाकारणाऱ्या या मुलांमध्ये फक्त प्राथमिक व माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील मुलांचाच विचार करण्यात आला आहे. जपानमध्ये सध्या हा एक मोठा सामाजिक प्रश्न झाला आहे. या प्रश्नाचा मानसशास्त्राच्या दृष्टीने अभ्यास करणारा एक लेख 'द अमेरिकन सायकॉलॉजिस्ट'च्या अंकात अलीकडेच प्रसिद्ध करण्यात आला होता. केंजी कामेगुची आणि स्टीफन मर्फी-शिगेमात्सु यांच्या या लेखातून पुढे आलेल्या काही मुद्द्यांमधून या प्रश्नाचे स्वरूप आपल्याला समजते.

कोणत्याही प्रकारची शारीरिक अकार्यक्षमता किंवा कोणतेही विशिष्ट कारण नसताना शाळेत न जाणाऱ्या मुलांची समस्या साधारणपणे १९८० च्या सुमारास प्राधान्याने लक्षात आली तरी १९६४ मध्ये प्रथमच अशा काही घटनांची नोंद जपानमधील ग्रामीण भागात व पौगंडावस्थेतील मुलांच्या संदर्भात करण्यात आली होती. १९८० मध्ये याला प्रथम 'स्कूल रिफ्युजल' असे संबोधण्यात आले आणि याची व्याख्या "कोणत्याही विशिष्ट कारणाशिवाय, मुले शाळेत न जाणे आणि आई-वडिलांना याची पूर्वकल्पना असणे," अशी केली गेली. थोड्याच काळात याला 'स्कूल फोबिया'

असे म्हणण्यात येऊ लागले. पण इंग्रजीमधील TRUANCY या शब्दापेक्षा त्याचा अर्थ वेगळा ठेवण्यात आला. (TRUANCY म्हणजे मुले शाळेत तर जात नाहीतच पण घरीही न थांबता कुठेतरी उनाडक्या करतात) जपानमध्ये मुलांनी शाळेत न जाण्यामागे अनेक कारणे आढळली. त्यातील दोन प्रकारची कारणे अभ्यासकांना महत्त्वाची वाटली. त्यापैकी एक आहे शैक्षणिक तर दुसरे आहे कौटुंबिक.

शालेय शिक्षणातील समानता म्हणजे एकाच साच्यातील अभ्यास, परीक्षाकेंद्री वातावरण, टोकाची स्पर्धात्मकता, मुलांमधील सुप्त गुणांकडे होणारे दुर्लक्ष, अभ्यासामुळे त्यांच्या आवडी-निवडींवर येणारी बंधने या गोष्टी मुलांना शाळेत न जाण्यासाठी प्रवृत्त करतात. दुसरे कारणही महत्त्वाचे आहे. जपानमधील अनेक कुटुंबांमधील मुले वडिलांकडून मिळणाऱ्या भावनिक पोषणाला मुकलेली असतात, असे आता लक्षात आले आहे. शिवाय, आई-वडिलांचा सुसंवाद नसणे हेही एक कारण यामागे आहे. जपानच्या संस्कृतीत प्रामुख्याने आईने मुलांकडे फार लक्ष देऊन त्यांचा शालेय विकास घडवून आणावा, असे अपेक्षित आहे. यातून मुले व आई यांचे परस्परसंबंधही ताणतणावाचे होत जातात. ते देखील मुलांना आवडत नाही. (जपानमधील यासंदर्भातील एक लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या (अंक क्रमांक १०, जुलै २०००) अंकात 'शिक्षण आणि जीवघेणी स्पर्धा' या शीर्षकांतर्गत प्रसिद्ध करण्यात आला होता.)

जपानने औद्योगिकीकरणाची कास धरल्याने शहरीकरण वाढले व पूर्वीची समाजव्यवस्था बदलली. औद्योगिक विकास करीत तेथील कर्मचाऱ्यांनी स्वतःचा विकास करणे हे प्राधान्याचे मानले गेले. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या कार्यात स्वतःला झोकून द्यायचे व कुटुंबाला कमी वेळ द्यायचा, हे आपोआप घडत गेले. त्यामुळे शाळेत न जाणाऱ्या मुलांच्या मानसिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या पितृत्वाच्या किमान गरजाही पूर्ण होत नाहीत. दुसरीकडे, या मुलांची आई सुशिक्षित असते व मुलांकडे लक्ष देण्यासाठी ती स्वतःचा विकास बाजूला ठेवते. तिच्या अपेक्षेप्रमाणे तिचे 'करिअर' होत नाही. यामुळे देखील आईच्या मनात परस्परविरोधी भावनांचा खेळ चाललेला असतो. या सर्वांचा ताण आईवर व ओघाने मुलांवर पडतो, असे अभ्यासकांना आढळले. आई जर मुलांमध्ये फार गुंतली असेल तर मुलांच्या विविध प्रकारच्या गुणात्मक वाढीत तो एक प्रकारचा अडथळा ठरतो. मग अशी मुले बंडखोरी करतात व शाळेत न जाण्याचे शस्त्र उगारतात. मुले पौगंडावस्थेत आली की हे प्रकार जास्त वाढतात. पौगंडावस्थेतील शाळेत न जाणारी ही बहुतांश मुले आईविरूद्ध

बंडखोरीच करतात आणि त्यांच्या वागणुकीत हा असा बदल होण्यापूर्वी मात्र ती अतिशय चांगली व आज्ञाधारक असत, असे लक्षात आले आहे. लहानपणी दिवसातील काही तास तरी आईपासून दूर म्हणजे पाळणाघरात जाणारी मुले मात्र या प्रकारात अडकलेली आढळली नाहीत, हेही महत्त्वाचे. अर्थात, समाजातील व्यक्तीनिहाय वेगळेपण असते पण तेवढेच साम्यही असते. काहीही असले तरी जपानमधील हा एक सामाजिक प्रश्न झाला आहे, हे खरे.

याच काळात जपानमधील युवावर्गही अस्वस्थ असून हिंसाचाराकडे झुकत असल्याचे निदर्शनास आले आहे. जपानमध्ये आर्थिक मंदी असून युवावर्गाला नोकऱ्या मिळणे दुरापास्त झाले आहे. आपल्या आजूबाजूचा समाजही अस्वस्थ आहे, हे या युवकांना दिसत असून आपल्या स्वप्नांची पूर्ती होऊ शकत नाही असे त्यांना वाटते. यातून त्यांच्या मनातील एकटेपणा वाढतो आहे. अशावेळी एखादा चांगला छंद वा चांगल्या मित्रांचा गट त्यांना मिळाला ठीक, नाहीतर ही मुले वाईट मार्गाला लागतात, असे येथे घडलेल्या अनेक घटनांवरून लक्षात आले आहे. अनेक युवकांना समजाविण्यासाठी मानसशास्त्राचा आधार येथे मोठ्या प्रमाणावर घेतला जात आहे. या पार्श्वभूमीवर जपानमध्ये मानसशास्त्र व विशेषतः पौगंडावस्थेतील मानसशास्त्र, कौटुंबिक विषयातील अभ्यासक यांची उणीव भासते आहे.

दरम्यान या सामाजिक प्रश्नावर केंजी कामेगुची आणि स्टीफन मर्फी-शिगेमात्सु या अभ्यासकांनी व इतर काहींनी उपाययोजना केल्या आहेत. शैक्षणिक बाजूपेक्षा त्यांनी कौटुंबिक बाजूला जास्त महत्त्व दिले आहे. पहिल्या पातळीवर, कौटुंबिक संवाद घडविणे, यावर भर देताना त्यांनी आई-मुलामधील संवाद, वडील-मुलांमधील संवाद आणि पती-पत्नी यांच्यातील संवाद यांवर लक्ष केंद्रित केले आहे. दुसऱ्या पातळीवर, शाळेतील शिक्षकांनाही सहभागी करून घेतले आहे. जपानमधील बौद्ध विचारधारेत, प्रत्यक्ष न बोलताही, संवाद साधण्याला महत्त्व आहे. त्याचाही उपयोग अभ्यासकांनी क्ले मॉडेल वापरून केला आहे. याशिवाय, फॅमिली एन्‌रिचमेंट प्रोग्रॅम आणि फॅमिली ॲक्टिव्हेशन प्रोग्रॅम हे त्यांनी हाती घेतले आहेत.

जपानमधील या सामाजिक प्रश्नाचे गांभीर्य आता कंपन्यांनाही समजू लागले आहे. सामाजिक जबाबदारी मान्य करून त्याही कर्मचाऱ्यांना अशा उपक्रमांमध्ये सहभागी होण्याला मदत करीत आहेत.

*(संदर्भ - इंटरनेट)* ■■

# मंगोलिया

मंगोलिया
राजधानी : उलानबटोर
शासन : रिपब्लिक
लोकसंख्या : ३१ लाख
चलन : तुघरिक

दक्षिणेला चीन व उत्तरेला सैबेरिया आणि रशिया या भौगोलिकदृष्ट्या मोठ्या असलेल्या देशांच्या मध्ये असलेला मंगोलिया हा ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिद्ध असलेला देश आहे. मंगोलवंशीयांचे साम्राज्य, एकेकाळी कोरिया, मांचुरिया, चीनचा काही भाग, व्हिएटनाम तिबेट, तुर्कमेनिस्तान, इराण, भारत (काश्मीर) अफगाणिस्तान अशा आशियातील अनेक देशांपर्यंत पसरलेले होते. भारताच्या उत्तरेपर्यंत त्या साम्राज्याची व्याप्ती होती. भारताचा व मंगोलियाचा संबंध चेंगीजखानमुळे आला होता. शतकांपूर्वी चेंगीजखान नामक एका मंगोलवंशीयाने इतिहासातील लढाया आपल्या क्रूरतेने व पराक्रमाने गाजविल्या होत्या. एवढा एक उल्लेख सोडला तर आधुनिक काळात जगात व विशेषतः भारतात मंगोलियाबाबतची चर्चा क्वचितच आढळते. विसाव्या शतकाच्या सुरूवातीला मंगोलियावर चीन व रशियाने अंमल प्रस्थापित केला होता. मंगोलिया १९२१ मध्ये स्वतंत्र झाला आणि १९२४ मध्ये 'पीपल्स रिपब्लिक ऑफ मंगोलिया' असे त्याचे नामकरण झाले. राजकीयदृष्टीने मंगोलिया विघटनापूर्वीच्या सोव्हिएट रशियाशी मिळता-जुळता होता. अलीकडे मात्र हा देश इतर देशांप्रमाणे जागतिक आर्थिक घडामोडीत येण्याचा प्रयत्न करतो आहे.

या देशाच्या आर्थिक -राजकीय परिवर्तनाची खुल्या बाजारात जी परिणती झाली, त्याचे सामाजिक परिणाम अनेक झाले. पण त्यातील सर्वाधिक गंभीर परिणाम म्हणजे बालकामगारांचे झालेले व्यापारीकरण. अर्थात, १९९१ मध्येही एकूण कामगारांमध्ये बालकामगार होतेच; पण त्यांचे प्रमाण खूप कमी होते. आर्थिक सुधारणांच्या काळात उत्पादनांचे मूल्य कमी करण्यासाठी, कमी पगारावर बालकामगारांना घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. एकीकडे, अनेक बालकांचे शिक्षण गरिबीमुळे रखडले आणि दुसरीकडे त्यांना कमी पगारावर का होईना, पण रोजगार मिळू लागला. त्यामुळे बालकामगारांना कामावर नेमण्याच्या प्रक्रियेचा भौगोलिक विस्तारही वाढत गेला. ग्रामीण भागातील मुले पशुपालन करताकरता थोडे शिक्षण घेऊ लागली. पण नंतर ही सांगड तुटून

पशुपालनच त्यांच्या हाती राहिले. शहरी भागातील चित्रही फारसे वेगळे नाही. शिक्षणाला मधूनच रामराम ठोकलेली मुले रस्त्यांवर पाव, मिठाई, फळांचे रस इत्यादी वस्तू विकताना दिसतात. थंडीच्या दिवसात, बहुधा बेकायदेशीर मार्गांनीच मिळविलेला कोळसा आणि सरपण विकतात. अशा मुलांची अधिकृत आकडेवारी उपलब्ध नसली तरी स्थूल अंदाजानुसार १९९० पासून किमान सव्वा लाख मुला-मुलींनी शाळेकडे पाठ फिरवली आहे. यातल्या केवळ काही मुलांचेच त्यांच्या कुटुंबांशी संबंध आहेत; तर बहुतांश मुलांचा त्यांच्या कुटुंबांशी असलेला संबंध पूर्णपणे तुटला आहे. मंगोलियाची राजधानी असलेल्या उलान्‌बटोर शहरात अशी मुले टोळ्या करून राहतात, बसगाड्या, रेल्वेस्थानके, भूयारी मार्ग या त्यांच्या झोपायच्या जागा असतात; आणि गरम पाण्याच्या मोठ्या वाहिन्या म्हणजे त्यांच्या गाद्या !

चांगल्या कामांप्रमाणेच, चोरी, भीक, शरीरविक्रय अशीही कामे ते करतात - त्यांच्याकडून करून घेतली जातात. त्यातही शरीर विक्रयाचा व्यवसाय खूप मोठ्या प्रमाणावर चालतो. केवळ जगण्यासाठी म्हणून किंवा शिक्षणाचा वाढता खर्च भागविण्यासाठी म्हणून, हा व्यवसाय केला जातो. लहान खाजगी हॉटेल्स, या कामासाठी भाड्याने घेतलेल्या मोटारी यांमधून हा व्यवसाय केला जातो. आपल्या टोळीला मदत म्हणून टोळ्यांचे पुढारी मुलींना वेश्या -व्यवसायात खेचतात. प्रथम फक्त टोळीतल्या मुलांशी त्यांचा शरीरसंबंध येतो; नंतर मात्र हे वर्तुळ वाढतच जाते. टोळीबाहेरच्या लोकांशीही असे संबंध यायला लागतात. हा वेश्याव्यवसाय असंघटित स्वरूपाचा असतो. याबरोबरच, संघटित वेश्याव्यवसायही असतोच. घरांमधून असा व्यवसाय चालतो. कुंटणखाना चालविणाऱ्या बाईकडून मुलींना संरक्षण मिळते; कपडालत्ता, जेवण मिळते; पण पैसे मिळतातच, असे नाही.

वेश्याव्यवसाय, मुले आणि मुली अशा दोघांकडून चालतो; तो असंघटित असो की संघटित असो, त्यात मोठे धोके असतात. विशेषतः असंघटित वेश्याव्यवसायातील धोके तर जास्तच असतात. ज्याठिकाणी असा व्यवसाय चालतो, तिथे हवा, पाणी, अन्न यांचे दुर्भिक्षच असते. त्यातून खरूज व तत्सम रोग तर होतातच; पण त्यापेक्षाही लैंगिक संबंधांमधून होणाऱ्या रोगांचे प्रमाणही मोठे असते. असे रोग त्यांचे आयुष्यभराचे साथीदार होतात. गरोदर राहिलेल्या मुलींना शिक्षण सोडावे लागते. १९९६ मध्ये ४००पेक्षा अधिक मुला-मुलींवर यासंदर्भातील उपचार केले गेले. त्यातील ६३ मुलींवर बलात्कार झालेला होता.

मंगोलिया हे राष्ट्र इतर राष्ट्रांसाठी जसजसे अधिक खुले होत जाईल, तसतशी ही परिस्थिती अतिशय वेगाने बिघडत जाणार आहे. यासाठी त्वरित उपायांची गरज आहे. अर्थात, काही स्वयंसेवी संघटनांनी या गंभीर समस्येची दखल घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातलाच एक प्रयत्न म्हणजे 'ट्रॉली उपक्रम.' जी मुले हमाली करतात, त्या मुलांना मजबूत आणि उच्च दर्जाच्या ट्रॉलीज नाममात्र भाड्याने / मासिक हप्त्याने दिल्या जातात. यातून मुलांची कार्यक्षमता आणि उत्पन्न तर वाढतेच, पण संघटनांना मिळालेल्या उत्पन्नातून उभारलेल्या निधीमधून या मुलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम असेही उपक्रम राबविले जातात.

असाच एक प्रयत्न म्हणजे विटा तयार करण्याचा प्रकल्प. उलान्‌बटोर शहरातील अनेक औद्योगिक केंद्रे बंद पडली आहेत. तिथे बेकारी व दारिद्रय खूप मोठे आहे. शाळा मध्येच सोडून दिलेल्या मुलांसाठी तिथे विटा तयार करण्याचा प्रकल्प उभा झाला आहे. तो प्रामुख्याने उन्हाळ्यात चालतो. १४ ते १७ वर्षे वयोगटातल्या बेकार मुलांना संबंधित प्रशिक्षण जागेवरच दिले जाते. शिक्षणाकडे पाठ फिरविलेल्या मुलांपैकी ५० टक्के मुलांना यात सामावून घेतले गेले. हा उपक्रम मुलांना खूप उत्पन्न मिळवून देणारा नाही, पण यातून त्यांना मिळते ती जिद्द, मिळतो अनुभव आणि आत्मविश्वास. या शिदोरीवर त्यांना भविष्यात स्वतःचा व्यवसाय उभारता येतो. कचरा वेचणाऱ्या मुलांचीही एक सहकारी संस्था अस्तित्वात आली आहे. या बालकामगारांच्या कामात सगळ्यात वाईट प्रकार म्हणजे बालवेश्याव्यवसाय हा आहे. बालकामगारांच्या समस्या सोडवायच्या असतील, तर याच समस्येकडे लक्ष केंद्रित व्हायला हवे. वेश्याव्यवसाय करणाऱ्या मुली शारीरिक रोगांना बळी पडतातच; शिवाय, त्यांचे मानसिक आरोग्यही उद्‌ध्वस्त होते. सुदैवाने हा व्यवसाय बाल्यावस्थेत आहे. पण परिणामकारक उपाययोजना केली गेली नाही तर मात्र परिस्थिती हाताबाहेर जाण्याचा धोका आहे.

एकंदरीत, मंगोलियात बाल-कामगारांच्या समस्या गंभीर आहेत. त्या सोडविण्यासाठी काही प्रयत्नांनाही सुरूवात झाली आहे. पण अजून बरीच मजल गाठायची आहे. बरीच मुले शिक्षणाची सुरूवात करण्याच्या दृष्टीने मोठी असतात. पण त्यांना ते करीत असलेल्या कामाचे प्रशिक्षण दिले तर ते त्यांना उपयुक्त ठरू शकते. अर्थात, अशी पन्नास हजार मोठी मुले दरवर्षी श्रमबाजारात दाखल होत असल्यामुळे त्यांना व्यावहारिक प्रशिक्षण देणे एक आव्हानच आहे. (संदर्भ - इंटरनेट) ■■

# पाकिस्तान

| |
|---|
| इस्लामिक रिपब्लिक ऑफ पाकिस्तान |
| राजधानी : इस्लामाबाद |
| शासन : लष्करी |
| लोकसंख्या : १६ कोटी |
| चलन : रुपया |

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील राजकीय संबंध, काश्मीर प्रश्न व दहशतवाद इत्यादी सर्व वादग्रस्त मुद्दे बाजूला ठेवून पाकिस्तानमधील सामाजिक घडामोडींची (विशेषतः स्त्रियांच्या संदर्भातील) दखल घेण्याचा हा एक प्रयत्न. भारताचे विभाजन होऊ न १९४७मध्ये धर्माच्या आधारावर पाकिस्तानची निर्मिती झाली, तेव्हापासून आजपर्यंत पाकिस्तानातील राजकारणात व समाजकारणात धर्माचे स्थान मध्यवर्ती राहिले आहे. पाकिस्तान स्वतंत्र झाल्यानंतर तेथील समाज एकसंध राहू शकेल, असा अंदाज होता. पण तसे घडले नाही. पाकिस्तानमधील कडवे मुस्लीम व धर्मनिरपेक्ष किंवा मवाळ मुस्लिम (सेक्युलर) यांच्यात धर्माला स्थान देण्यावरून वाद झालेच. प ख्तून आणि बलोच यांना पाकिस्तानचे सरकार उपरेच वाटत आले आहे. फाळणी झाली तेव्हा भारतातून पाकिस्तानात आलेले मुस्लिम हे 'मुहाजिर' (निर्वासित) म्हणून ओळखले जातात. त्यांचा एक वेगळा गट आपले अस्तित्व कायम राखून आहे.

१९५० ते १९६० या काळात पाकिस्तानने आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरण स्वीकारले. झुल्फिकार अली भुट्टो यांनी १९७१ मध्ये 'इस्लामिक सोशॅलिझम' ही कल्पना पुढे मांडली. त्यांच्या पक्षाच्या काळातही पाकिस्तानातील सर्वसामान्य जनतेच्या राहणीमानात फारसा फरक झाला नाही. कनिष्ठ वर्ग व मध्यमवर्ग यांच्यातील ताण-तणाव वाढले. राष्ट्रीयीकरणाच्या गोंधळात मोठे उद्योगपती सरकारपासून दूर गेले. यानंतरच्या काळात पाकिस्तानमधील राजकारणात वशिलेबाजीने धुडगूस घातला. धार्मिक गट आपले अस्तित्व राखून होतेच. १९८० च्या दशकात येथे काही सामाजिक प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न झाला. अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांनी पाकिस्तानमधील सामाजिक स्थितीवर टीका केली. १९९० च्या दशकात मात्र पाकिस्तानमधील अनेक नागरिकांना देशातील राजकीय गोंधळ, भ्रष्टाचार व सामाजिक स्थिती याचा वीट आला होता आणि त्यावर त्यांना योग्य उत्तर शोधता येत नव्हते. तेथे एक प्रकारची अस्थिरता होती. यामुळे

वेगवेगळ्या वांशिक गटांमधील ताण-तणाव व वर्गभेद वाढले, धार्मिक गटांमध्ये फूट पडली. दरम्यान, तेथील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीबाबत मात्र जागरूकता निर्माण होऊ लागली.

१९९० च्या दशकाच्या सुरूवातीला येथील स्त्रियांसमोर काही आव्हाने उभी ठाकली. त्यातील महत्त्वाची म्हणजे स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे, त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होऊन अर्थकारणातील त्यांचा सहभाग वाढणे, स्त्रियांच्या बदलत्या भूमिकेकडे व दर्जाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण बदलणे आणि राजकीय व अन्य क्षेत्रांत त्यांच्या मताला अर्थ प्राप्त होऊन त्यांना समाजाचा व्यापक पाठिंबा मिळणे.

पण या स्थितीपर्यंत येण्याआधी मुस्लिम महिलांच्या झालेल्या प्रगतीचा थोडक्यात आढावा घेतला तर असे लक्षात येते की, स्त्रियांच्या संदर्भातील सुधारणा या इस्लाम व शरियतभोवतीच फिरलेल्या आहेत. त्याहीपूर्वी - म्हणजे १८७० च्या सुमारास - इस्लामच्या कायद्यातंर्गत स्त्रियांचे अधिकार जपण्याचे काही प्रयत्न झाले होते. सर सय्यद अहमद खान व त्यांच्या काही सहकाऱ्यांनी, मुस्लिमांनी नवीन शिक्षण घ्यावे व स्त्रियांनाही शिक्षण द्यावे यासाठी प्रयत्न केले होते. बहुपत्नीकत्वाची चाल रद्द होण्यासाठीही प्रयत्न झाले होते. १९२१ मध्ये मुस्लिमधर्मीय महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प म्हणजे दर हजार महिलांमागे चार शिक्षित महिला - एवढे कमी होते. पाकिस्तानची निर्मिती व्हावी असे प्रयत्न करणाऱ्या मोहम्मद अली जिना यांनी १९४४ मध्ये असे म्हटले होते की, मुस्लिम स्त्रियांची प्रगती झाल्याशिवाय या समाजाला प्रगती करता येणार नाही. स्त्रियांना चार भिंतीत बंद करणे हे मानवतेच्या विरोधात आहे. आपल्या समाजातील वाईट चालीरीतींचे आपणच बळी ठरलो आहोत.

पाकिस्तान स्वतंत्र झाल्यानंतर सुशिक्षित मुस्लिम स्त्रियांनी स्त्रियांच्या अधिकारासाठी कायदेशीर लढा सुरू ठेवला होता. १९४८ मध्ये स्त्रियांना वडिलोपार्जित संपत्तीतील वाटा मिळावा, यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न यशस्वी झाले होते. यानंतर १९६१ मध्ये विवाह व घटस्फोट यासंबंधीच्या कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आली. स्त्रियांच्या दृष्टीने ही एक मोठी सुधारणा होती. १९७७ ते १९८८ या काळात झिया यांनी इस्लीमीकरणाच्या काही योजना राबविल्या, त्यावेळी स्त्रियांचे हक्क जपण्यासाठी शहरी महिलांनी संघटना स्थापन केल्या होत्या. १९८१ मध्ये स्त्रियांचे समाजातील स्थान बळकट करण्यासाठी 'विमेन्स ॲक्शन फोरम'ची स्थापना करण्यात आली होती. झिया

यांच्या सरकारने सुचविलेल्या अनेक कायद्यांमुळे स्त्रियांचे नुकसान होईल, असे या मंचाचे म्हणणे होते. 'आधुनिक समाजात स्त्रियांच्या संदर्भातील इस्लामचा कायदा' यावर या मंचाने अनेक वादग्रस्त मुद्दे उपस्थित केले. १९८६ ते १९९० या काळात शरियत विधेयक, नागरी कायदा, लोकशाही, समानता अशा अनेक विषयांवर या मंचाने समाजसुधारणेची आधुनिक भूमिका स्वीकारली. जगात हळूहळू एकविसाव्या शतकाकडे जाण्याची तयारी चालू होती तेव्हा, येथे स्त्रियांनी खेळाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये जावे किंवा नाही, अर्थाजनासाठी घराबाहेर पडावे की नाही अशा चर्चा सुरू केल्या. पण तरी १९९० च्या सुमारास विविध क्षेत्रांत कर्मचारी असणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण एकूण कामगारांच्या संख्येपैकी १३ टक्के झाले होते.

१९९२ मध्ये युनिसेफने पाकिस्तानाते केलेल्या एका सर्वेक्षणानुसार असे आढळले की येथील स्त्रिया अतिशय असमानतेच्या परिस्थितीत काम करतात. त्यांना वेतन देताना भेदभाव केला जातो. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांची परिस्थिती तर अजूनच वाईट आहे. यानंतर सरकारच्या १९९३-९८ या पंचवार्षिक योजनेत या अभ्यासातील निष्कर्षांचा समावेश करण्यात आला होता. १९९० च्या दशकात येथील स्त्रीसंघटनांचे काम हळूहळू वाढू लागले. 'विमेन्स ॲक्शन फोरम', 'ऑल पाकिस्तान विमेन्स असोसिएशन', 'द पाकिस्तान विमेन्स लॉयर असोसिएशन', 'द बिझिनेस अँड प्रोफेशनल विमेन्स असोसिएशन' अशा अनेक संघटना सध्या येथे कार्यरत आहेत. संततीनियमन, आरोग्य अशा सुधारणांबरोबरच लघुउद्योगांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढावा, त्यांना अर्थार्जनासाठी प्रवृत्त केले जावे, त्यांचे अधिकारक्षेत्र वाढावे अशी उद्दिष्टे समोर ठेवून हे काम पुढे चालले आहे.

तरीदेखील अलीकडेच येथील एका घटनेने या संघटना अस्वस्थ झाल्या आहेत. वडिल व भाऊ यांच्या विरोधात जाऊन रिफ्फत या युवतीने कुवर अहसान या युवकाशी प्रेमविवाह केला म्हणून या युवकावर गोळीबार करण्यात आला होता. यानंतर अस्मा जहांगीर या महिलेने रिफ्फतच्या बाजूने खटला लढविला आणि इस्लामच्या कायद्यामध्ये युवतींना आपल्या मर्जीने लग्न करण्याचा अधिकार आहे, हे मंजूर करून घेतले. स्त्रियांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या अस्मा जहांगीरला अनेक धमक्या सतत येत असतात. कट्टर धर्मीयांनी या महिलेवर हल्ला करण्याचाही प्रयत्न केला आहे. यावरून पाकिस्तानात स्त्रियांच्या विकासासाठी काम करणे अजूनही अवघड आहे हे स्पष्ट होते.

*(संदर्भ - इंटरनेट)* ■■

(पान २ वरून )
हे तरूण वाचकांना स्पष्टपणे सांगायला पाहिजे. आधीच शंकांचे जाळे उभे करणे योग्य नाही. हा मुद्दा पुढे आणखी स्पष्ट केला आहे. थिंक स्मॉल या लेखातही वास्तवाच्या एका मोठ्या भागाकडे दुर्लक्ष झाले आहे. आजच्या मानवी व्यापारात दोन मोठी वास्तवे आहेत; (१) सध्याच्या जगात उत्पादक व ग्राहक हे एकमेकांना परके असतात. ग्राहक स्वस्त व चांगला माल शोधत असतो; मोठे कारखानेच असा माल पुरवितात. (२) असा विक्रीयोग्य माल गरिबांनी तयार केला, तरच त्यांची गरिबी जाईल असे पहिल्या विधानातून निष्पन्न होणारे दुसरे विधान. गरिबी दूर करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे निर्यात वाढविणे असे समजले जाते. हे विधानच मुळी चुकीचे आहे. मागणी कुठे आहे, कशाची आहे, भांडवल कुठून मिळेल या प्रश्नांच्या उत्तरांनी व्यापाराची दिशा ठरेल. भारताच्या बाबतीत तरी असे आहे की, आयातीची गरज असल्यामुळे निर्यातीची गरज आहे.

रागावर नियंत्रण ठेवून, आपण हिंसा न करणे हा एक स्तुत्य आदर्श आहे. पण इतर कोणी माझ्याविरूद्ध हिंसा करीत असेल, तरीही मी अहिंसकच राहावे असे केवळ बायबल व महात्मा गांधी म्हणतात. गीता म्हणते, ‘आततयिनं आयांताम् हन्याद् हवा विचारयन्.’ म्हणजे, ‘आततायी माणूस आपल्यावर चालून आला तर त्याची बेलाशक हत्या करावी.’ तुकाराम म्हणतात, ‘भले तरी देऊकासेची लंगोटी, नाठाळाचे माथी देऊ काठी.’ कुराणसुद्धा असेच सांगते. अलीकडे जगात ज्या मोट्याा हिंसा होत आहेत त्या तीन कारणांमुळे होत आहेत. (१) अन्यायामुळे (उदा - पॅलेस्टीन) (२) पिसाटपणा (तालिबान, राममंदिर चळवळ, माओवाद, नक्षलवाद - पण यातही अन्यायाचा कांगावा केला जातो.) आणि (३) स्वतःच्या सुरक्षिततेला धोका (भांडवलशाही देश व कम्युनिस्ट देश यांच्यातील संघर्ष, दहशतविरोध वगैरे) या हिंसाना सोपे उपाय नाहीत.

थोडक्यात सांगायचे म्हणजे नवीन कल्पनांचे जरूर स्वागत करावे पण असलेले वास्तव तसे आहे का हेही जाणून घ्यावे. त्या वास्तवाला भक्कम अस्तित्ववादी आधार असतो. एखादी नवीन कल्पना मांडल्याबरोबर युरेका म्हणू नये.

भ.पां. पाटणकर, हैदराबाद

विविध इंग्रजी लेखनांत नवीन कल्पना, नवे विचार व विश्लेषण जशी आढळतात तशीच ती आम्ही सजग वाचकांपुढे आणतो. सामान्यतः त्यात आमचा अभिप्राय नसतो. त्यामुळे युरेका आम्ही म्हणत नसतो. - संपादक

# नेपाळ

नेपाळ
राजधानी : काठमांडू
शासन : राजा असलेले संसदीय लोकशाही शासन
लोकसंख्या : २ कोटी ६० लाख
चलन : रुपया

नेपाळ हा भारताचा अगदी जवळचा शेजारी. हिमालयाच्या कुशीत वसलेला. भारतीय उपखंडापासून अलग आणि भारत व तिबेट यांच्यामध्ये असलेला हा देश. छोटासा शेतीप्रधान देश. 'जगातील एकमेव हिंदू राष्ट्र' म्हणून प्रसिद्ध. बौद्धधर्माच्याही परंपरेचा वारसा असणारा. (आणि जो त्याने पुढे तिबेटला दिला ! ) मिश्रवंशीय लोकसंख्या असलेला हा देश. अठराव्या शतकाच्या मध्याला गुरखा राजघराण्याने आपल्या राज्याचा विस्तार करून काठमांडू, पाटण नि भक्तपूर अशा तिन्ही राज्यांचे एकत्रीकरण केले. पुढे एकोणिसाव्या शतकात तर हा विस्तार भारतातील सतलज नदीपर्यंत पोचला. परिणामत; नेपाळला भारतातील इंग्रजांशी युद्ध खेळावे लागले. (१८१४-१८१६) दुसऱ्या बाजूला चीनशीही मुकाबला करावा लागला (१७९२). पुढे १८४६ मध्ये उठाव होऊन, मोठे हत्याकांड घडवून जंगबहादूर राणा सत्तेवर आला. (१८४६-१८७७). [ हा राणा १८५० मध्ये युरोपीय देश असलेले इंग्लंड आणि फ्रान्स यांना भेट देणारा, दक्षिण आशियातील पहिलाच सत्ताधारी होता !] यानेच तिबेटशी युद्ध पुकारून त्याला वार्षिक खंडणी देणे भाग पाडले (१८५६). तसेच १८५७ चे बंड मोडून काढण्यातही, इंग्रजांचा मित्र असणारा हा राणा, अग्रेसर होता. त्याच्याच पुढाकाराने इंग्रज सैन्यात 'गुरखा रेजिमेंट' निर्माण करण्यात आली. राणांची सुमारे शतकभर चाललेली सत्ता १९५१ मध्ये उलथवून टाकण्यात आली. राजा वीर विक्रम त्रिभुवन याने (भारतात परागंदा होऊन) भारताच्या मदतीने, आपली हुकुमशाही सत्ता प्रस्थापित केली. या काळापासून खऱ्या अर्थाने नेपाळची आधुनिकतेकडे वाटचाल सुरू झाली.

नेपाळ आणि थायलंड बाबत खास बाब अशी की, तेथे कधीही पाश्चात्यांची वसाहतवादी सत्ता नव्हती. आपली स्वायत्तता या देशांनी नेहमीच राखली होती. आज नेपाळमध्ये राष्ट्रीय पंचायत आहे, आणि गावपातळीवर लोकशाहीव्यवस्था आहे. येथे मंत्रिमंडळ आहे, पंतप्रधान आहे, परंतु सर्वोच्च सत्ता मात्र राजाच्याच हाती आहे. अडीच कोटी लोकसंख्या असलेल्या नेपाळमध्ये आज चाळीसपेक्षाही अधिक वंशांचे

किंवा जमातींचे लोक राहतात. त्यामुळे नेपाळचे असेही एक वैशिष्ट्य सांगतात की इथे, अगदी अश्मयुगीन जीवनपद्धतीपासून ते आजच्या जेटयुगापर्यंतची भिन्न भिन्न जीवनपद्धती आढळून येते. नेपाळी समाजातील दोन मोठे सांस्कृतिक गट म्हणजे उत्तरेकडील 'टिबिटो - बर्मन्स' किवा 'मंगोलाईडस्' आणि दक्षिणेकडचे 'इंडो-आर्यन्स.' त्यामुळे या दोन्हींच्या परंपरातून येथे मिश्र संस्कृती निर्माण झाली आहे. जगात, चिवट गिर्यारोहक म्हणून प्रसिद्ध असलेल्या शेर्पांची (एव्हरेस्टवर पहिले पाऊल ठेवणारा तेनझिंग शेर्पा आठवेल) वस्ती इथल्या पूर्वेकडील भागात आहे. ('शेर्पा' याचा अर्थच मुळी 'पूर्वेकडचे रहिवासी' असा आहे.) शेती, गुरे पाळणे, व्यापार असे मुख्य व्यवसाय असणारे हे लोक बौद्धधर्मीय असून ते तिबेटी भाषा बोलतात.

नेपाळमधील काही वांशिक गटांची नावे ही त्यांच्या व्यवसायांवरून पडलेली आढळतात. उदाहरणार्थ, कामी (लोहार), दमाई (शिंपी), धिबी (धोबी) सरकी (चांभार), गाईनी (व्यावसायिक गायक) आणि कुंभार. पण या सर्व जाती-वंशाच्या लोकांच्या राहणीमानात आणि पद्धतीत फार अंतर आहे. स्त्रियांना बऱ्यापैकी हक्क नि स्वातंत्र्य मिळाले असले तरी, त्यांना अजूनही कायद्याने समानता प्राप्त झालेली नाही. हिंदू संस्कृतीप्रमाणे येथे वयस्कर लोकांना आदराच्या स्थानी मानले जाते. परंतु सत्तास्थानांवर आणि सामाजिक -सांस्कृतिक क्षेत्रांत वयस्कर लोकांचे असलेले वर्चस्व आजचे काही सुशिक्षित तरुण स्वीकारु इच्छित नाहीत. त्यामुळे अनेक रूढी नि परंपरांच्या विरोधात तरुण आपली मते प्रदर्शित करू लागला आहे. सॅटेलाईट टेलिव्हिजनच्या प्रसारामुळे पाश्चात्यसंस्कृतीही युवकांच्या मनांत नि व्यवहारांत शिरू लागली आहे.

शिक्षणाचे प्रमाण वाढत चालल्यामुळे जाती, धर्म आणि लिंगभेद यांतील अंतर कमी होत चालले आहे. मात्र अजून आंतरजातीय विवाहांना फारसा प्रतिसाद मिळत नाही. उपजातींमध्ये मात्र विवाह मोठ्या संख्येने होऊ लागले आहेत.

इतर अनेक दक्षिण आशियाई देशांप्रमाणे, नेपाळमध्येही गरिबी मोठ्या प्रमाणात आहे. 'ॲग्रिकल्चरल परस्पेक्टिव्ह प्लॅन'च्या अंतर्गत, शेती सुधारणांचे अनेक कार्यक्रम अंगिकारून, गरिबीचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे. तरीही जागतिक व्यापार संघटनेत सामील झाल्यापासून नेपाळमध्ये दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्यांची प्रत्यक्ष संख्या वाढली आहे, असे म्हटले जाते. अनेक परकीय कंपन्या शेती, शेतीमालप्रक्रिया, शेतीबाजार यात प्रत्यक्ष उतरून स्थानिक शेतकऱ्यांना विस्थापित करण्याची भीती, येथे व्यक्त केली जात आहे. अलीकडेच 'जागतिक व्यापार संघटना नि जागतिकीकरण

यांचा नेपाळच्या शेतीवर होणारा परिणाम' याविषयीचे चर्चासत्र राष्ट्रीय स्तरावर आयोजित केले गेले. यामध्ये या परिणामांविषयी चिंता व्यक्त करण्यात आली.

नेपाळमध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा कमी झाला आहे. (४१ टक्के) परंतु शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या मात्र तेवढीच राहिलेली आहे. शेती, उद्योग या क्षेत्रांमधील व्यापारअटी नेहमीच शेतीला हानिकारक ठरत आल्या आहेत. सरकारने शेतीमालाच्या ठरवून दिलेल्या किंमती किंवा आधारभूत किंमती या नेहमीच बाजारातील प्रत्यक्ष किंमतीच्या तुलनेत कमी आहेत. त्यामुळे त्यांचा व्हावा तसा फायदा शेतीला कधीच झाला नाही. एकेकाळी नेपाळमध्ये अतिरिक्त धान्य पुरवठा होता. तरीही देशात अन्नाची उपलब्धता कमी आणि आणि कुपोषणाचा प्रादुर्भाव होताच. अलीकडच्या काळात तर धान्यपुरवठ्यात तूट येत आहे. त्यामुळे ही परिस्थिती अधिकच गंभीर होण्यांची भीती, वर उल्लेखित चर्चासत्रामध्ये व्यक्त करण्यात आली होती.

आरोग्यविषयक सोयींच्या बाबतीत, सरकारने अनेक प्रयत्न करूनही ते अपुरे पडताहेत. ३० ते ३५ टक्के मुले जन्मत;च कमी वजनाची असतात. बाळंतपणात मृत्युमुखी पडणाऱ्या स्त्रियांची संख्या लाखात ५४० इतकी आहे. आशियामध्ये ही सर्वात जास्त आहे. क्षयरोग, हिवताप अशा जुन्या रोगांचे प्रमाणही खूप आहे. नेपाळमधील ७३ टक्के लोकांना अजूनही पुरेशा स्वच्छतागृहांच्या सोयी नाहीत. कुपोषित मुलांचे प्रमाण ४० ते ५० टक्क्यांच्या दरम्यान आहे.

पण, नेपाळ आता बदलत चालला आहे. जागतिकीकरणाचे वारे या प्रदेशातूनही वाहू लागले आहेत. नवे तंत्रज्ञान आत्मसात करायचे तर प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाची चांगली सोय करायला हवी, हे लक्षात घेऊन शिक्षणातील सुधारणांकडे पावले टाकली जात आहेत. उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर मात्र रोजगार, अर्धरोजगार आणि उत्पन्नाचे विभाजन या क्षेत्रांवर विपरित परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. मात्र गेल्या दशकात राष्ट्रीय उत्पन्न ४.८ टक्क्यांनी वाढले आहे. नेपाळ आता आर्थिक सुधारणांसाठी जागतिक प्रवाहात उतरला आहे. *(संदर्भ - इंटरनेट, 'ह्युमन डिव्हलपमेंट इन साऊथ एशिया,' २००१ व 'एन्सायक्लोपीडीआ ऑफ एशियन हिस्टरी')* ■■

सूचना

'अर्थबोधपत्रिके'चा हा जोडअंक (ऑक्टोबर-नोव्हेंबर २००३) असून यापुढील डिसेंबर २००३ चा अंक १० डिसेंबरला प्रसिद्ध होईल.

# आशियात पसरलेल्या चिनी नूडल्स

चीन या देशाकडे नूडल्सचे आणि इटलीकडे पास्ताचे जनकत्व दिले जात असले तरी, अनेक इतिहासकारांचे मत असे आहे की, त्यांचा उगम पर्शियात झाला असावा. तेथून हे पदार्थ चीनमध्ये व इतरत्र पसरले असावेत. आज आशियातील जेवणातील मुख्य घटक नूडल्स हा आहे. नूडल्स तयार करणे फारसे कठीण नसून त्या स्वस्तही आहेत. अनेकविध पदार्थांबरोबर त्या खाता येतात. चीन, जपान आणि फिलिपिन्स येथे वाढदिवसाच्या दिवशी खूप लांब म्हणजे -अगदी वीस बावीस मीटर्स लांब नूडल्स तयार करतात. 'लांब नूडल्स म्हणजे दीर्घायुष्य' असे मानले जाते.

ली जिआन हा एकवीस वर्षीय चिनी तरूण. चीनच्या ईशान्येकडील शांझी भागातील 'द नूडल लॉफ्ट' नावाच्या हॉटेलमधील मुख्य आचारी (शेफ्). नूडल्स व पास्ता तयार करण्यात वाकबगार. तो म्हणतो, 'शांझी भागात तुम्ही वर्षातील ३६५ दिवस वेगवेगळ्या नूडल्स खाऊ शकता आणि एकही दिवस आधीचा नूडल्सचा प्रकार पुन्हा खावा लागणार नाही, इतकी विविधता त्यात आहे.'

चीनमधील नूडल्सचा इतिहास फार जुना आहे. ख्रिस्तपूर्व २०६ या काळापासून, म्हणजे हॅन राजघराण्याच्या अखेरीच्या काळापासून, तेथे नूडल्स हा प्रकार खाण्यात येत होता. शांझी भागातील हॉटेलमध्ये तर, 'जगातील सर्वोत्कृष्ट पास्ता - चिनी पास्ता, इटालियन नव्हे' असे लिहिलेले आढळते.

ली जिआनला चीनी भाषेतील एक लोकगीत पाठ आहे. त्यात पास्ताच्या किमान ४०० प्रकारांची नावे आली आहेत. (या काव्याला 'पास्तानामावली' असे म्हणत असतील ?) तांग राजघराण्यातील कवी ली बेई यांची, अन्नाची खूप प्रशंसा असलेली एक कविता आहे. ली जिआनने ती देखील पाठ केली आहे. ली जिआन २२ मीटर्स लांब नूडल्स तयार करू शकतो आणि त्याची किंमत आहे फक्त एक अमेरिकन डॉलर किंवा आठ रेन्मिन्बी. कणीक आणि पाणी व किंचित मीठ या घटक पदार्थांपासून सर्वात चांगल्या नूडल्स तयार होतात, असे ली म्हणतो. पण गहू, तांदूळ, मका आणि इतरही काही धान्यांपासून अतिशय चांगल्या नूडल्स येथे तयार केल्या जातात. नूडल्स शिजविण्याच्याही असंख्य पद्धती आहेत आणि त्या अनेकविध पदार्थांबरोबर, सूप्सबरोबर खाण्याच्या पद्धतीही खूप आहेत. (शांझी येथे नूडल्स बरोबर खाण्यासाठी किमान आठ

प्रकारचे सॉस देण्यात येतात). टी.व्ही.वर 'यान कॅन कुक' या प्रसिद्ध झालेल्या मालिकेतील शेफ मार्टिन यान, हे आशियातील खाद्यपदार्थ तयार करण्यात प्रसिद्ध असून त्यांच्या आवडीच्या नूडल्सचे प्रकार म्हणजे जपानमधील झारू सोबा, व्हिएटनाममधील बान फो, चीनमधील डॅन डॅन में, थायलंडमधील फड थाई हे आहेत. वॉन्टन नूडल सूप हाही एक प्रकार त्यांना आवडतो.

शांघायमध्ये फिओना वँग या नावाचे नूडल्सचे एक प्रसिद्ध व्यापारी आहेत. ते कॅनडा येथून मायदेशी परतले आहेत. (पश्चिमेकडे जाऊन मायदेशी परत आलेल्यांना चीनमध्ये 'हाईगुई' म्हणजे 'सागरी कासव' असे म्हणतात !) नूडल्स तयार करण्याचे मोठे दुकान ते चालवितात. पूर्वी सरकारच्या अखत्यारीतील या दुकानात आता वातानुकूलित यंत्रे व आधुनिक यंत्रसामग्री दिसते.

भारत व नूडल्स

भारतातील केरळ प्रांताचा व नूडल्सचा संबंध फार जुना आहे, हे ऐकून आश्चर्य वाटेल. कदाचित, दोन हजार वर्षांपूर्वी चीनकडून हा पदार्थ केरळमध्ये आला असावा, असे म्हटले जाते. केरळमध्ये 'इडियाप्पम' नावाचा एक खाद्यपदार्थ फार प्राचीन काळापासून प्रचलित आहे. तांदुळाच्या पिठापासून केलेल्या या हलक्या नूडल्स वाफवून त्या, विविध प्रकारचे रस्से वा पातळसर चटणीबरोबर नाश्त्याच्या वेळी खाणे, ही केरळमधील विशेषता आहे.

दाक्षिणात्य पदार्थांमध्ये विशेष रूची असणारे व अन्नपदार्थांचे अभ्यासक असलेले, प्रवीण आनंद या बल्लवाचार्याचे म्हणणे असे की, चीनमध्ये रूढ असणारी वाफविण्याची पद्धत, भारतात १४ व्या शतकात आलेल्या कुबलाई खान नामक व्यापाऱ्याकडून आली असावी. पूर्वी हाताने तयार करण्यात येणाऱ्या या इडियाप्पम आता मशीनने तयार करण्यात येत असल्या तरी त्याला 'ती' चव येत नाही, असे काहींचे म्हणणे आहे. (महाराष्ट्रातील शेवया याच प्रकारात मोडतात. त्या मूळच्या भारतीय आहेत की चीनमधून आलेल्या आहेत, हे मात्र नक्की कळू शकलेले नाही.)

व्हिएटनाम व आरारूट नूडल्स

व्हिएटनाममध्ये, चीनमध्ये तयार करंतात तशाच प्रकारे नूडल्स तयार केल्या जात होत्या. पण, 'गरज ही शोधाची जननी आहे,' या म्हणीला अनुसरून व्हिएटनाममधील नूडल्सने वेगळा मार्ग स्वीकारला. १९५० ते १९६० या काळात व्हिएटनाममधील नागरिकांना नूडल्स तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या तांदळाचे प्रमाण कमी

करण्याची सूचना देण्यात आली. तेव्हा ग्रामीण भागातील नागरिकांनी आरारूट या पिकाची लागवड केली व त्याचा वापर करून नूडल्स तयार केल्या. (आरारूट हे एकेकाळी फक्त डुकरांचे खाद्य समजले जाई.) आरारूट हे पिष्टमय पदार्थांमध्ये मोडते. आता या प्रकारच्या नूडल्स ही व्हिएटनामची विशेषता झाली असून त्याची ख्याती फ्रान्सपर्यंत पोचली आहे. या नूडल्स चिनी व थाई नूडल्सपेक्षा वेगळ्या असून त्या जास्त जाडसर करता येतात. क्रॅब सूप बरोबर खाण्यासाठी त्या सर्वोत्तम मानल्या जातात. व्हिएटनामची राजधानी असलेल्या हनोई शहरात या नूडल्स तयार करणे, हा एक मोठा उद्योगच आहे. मशीनपेक्षा हातानी केलेल्या नूडल्सची चव वेगळी व चांगली वाटते असे जाणकार म्हणतात.

मलेशियातील लाकसा नूडल्स

मलेशियातील लोक खाद्यपदार्थांबाबत बोलत असतील, तर लाकसा नूडल्सचा विषय चर्चेत येणारच, असे म्हटले जाते. लाकसाचे मूळ पर्शियन भाषेत आहे. नूडल्सला पर्शियन भाषेत लाखसा किंवा लाक्षा (याचा शब्दशः अर्थ 'घसरणारे' असा होतो. ) असे म्हटले जाते. मलेशिया व इंडोनेशिया येथे तेराव्या शतकात आलेल्या अरब व्यापाऱ्यांनी येथील जनतेला नूडल्सची चव दिली, असे मानले जाते. मलेशियात लाकसा हे नाव कायम राहिले आहे, मात्र गावोगावी त्याची चव बदलत गेली आहे. मलाक्कातील योंया लाकसा व पेनांगमधील आसाम लाकसा या प्रसिद्ध असून चवीच्या दृष्टीने त्या फार वेगळ्या आहेत. चिनी व मलय या संस्कृतींच्या एकत्रीकरणातून मलाक्कातील लाकसाची चव तयार झाली आहे. या नूडल्स कोणत्याही इतर पदार्थांबरोबर चांगल्या लागतात.

जपानमधील सानुकी उदो नूडल्स

जपानमधील शिकोकू या बेटावरील कागावा या भागात तयार होणाऱ्या उदो नूडल्स खाण्यासाठी अनेक दूरच्या ठिकाणांहूनही लोक येतात. कागावा भागातील सानुकी गावात उदोचा जन्म झाला. या नूडल्सची विशेषता म्हणजे त्या रबरासारख्या चिवट व चघळता येण्यासारख्या असतात. खोलगट बश्यांमध्ये त्या वाढण्याची व खाण्याची विशिष्ट पद्धत आहे. तळाशी थोडे सूप आणि त्यावर या नूडल्स असे खाल्ले जाते. टोकियो भागात मात्र या नूडल्स वेगळ्या प्रकारे खाल्या जातात. सानुकीतील नूडल्सची लोकप्रियता हळूहळू वाढत असून पूर्वी या नूडल्स खाण्यासाठी केवळ दहा-वीस माणसं यायची; आता तेथे येणाऱ्यांची संख्या पंधराशेपेक्षा जास्त झाली आहे.

फिलिपिन्समधील पॅन्सिट हॅब हॅब

केळीच्या पानावरील नूडल्स आणि ते देखील चमचा किंवा चॉप स्टिक न वापरता खाणे, ही येथील खास बाब आहे. गव्हाच्या पीठापासून केलेल्या नूडल्स, गाजर व कोबी या भाज्या आणि त्यावर डुकराच्या मांसाचे तुकडे - विशेषतः पुढच्या पायाचे. काळे मिरे, व्हिनेगर इत्यादींनी सजविलेल्या या नूडल्स हे येथील सामान्य नागरिकांचे दुपारचे आवडीचे व पोटभरीचे जेवण आहे. केळीचे पान हातात धरून थेट तोंडाने मटकाविण्याच्या या नूडल्सला आवाज करीत खाण्याच्या या प्रकारावरून 'पॅन्सिट हॅब हॅब' म्हणजे 'मचक मचक करीत खाणे' असे नाव मिळाले आहे. फिलिपिन्समध्ये सर्वत्र हा खाद्यप्रकार अस्तित्वात असून लुकबान या शहरात तो जास्त प्रमाणात प्रसिद्ध आहे. तेथील वार्षिकोत्सवात तर त्याला विशेष महत्त्व आहे.

देशाप्रमाणे नूडल्सचे प्रकार बदलत गेले असले तरी आशियातील पूर्वेकडील राष्ट्रांमध्ये चीनमधील नूडल्सने महत्त्वाचे स्थान मिळविले आहे, हे मात्र खरे आहे.

*(संदर्भ - एफ.ई.ई.आर., ७ ऑगस्ट २००३)* ■■

## थायलंडमधील जिराफ वुमन

थायलंडच्या उत्तर भागाच्या टोकावर असलेली था टोन आणि साई नोई ही छोटी गावे पर्यटकांसाठी आकर्षणकेंद्रे झाली आहेत. याला कारण तेथील सृष्टिसौंदर्य नव्हे तर, तेथील पाडुंग आदिवासी जमातीतील जिराफासारखी उंच मान करणाऱ्या स्त्रिया आहेत. या स्त्रियांची लांब झालेली मान बघायला दरवर्षी सुमारे दहा हजार पर्यटक येतात व त्यामुळे थायलंडमधील पर्यटनविभागाला हजारो डॉलर्सचे उत्पन्न मिळते. या स्त्रिया आपल्या मानेभोवती तांब्याच्या वजनदार कड्या घालतात त्यामुळे त्यांचा चेहरा वर ओढला जातो आणि मान लांब होऊन ती सुंदर (?) दिसते. या कड्यांमुळे अर्थातच त्यांच्यात मानेसंबंधी काही शारीरिक व्यथा निर्माण होतात व त्या आयुष्यभर टिकतातही. पण या स्त्रिया तेही सहन करतात. का ? तर त्या जमातीत असे मानले जाते की, फार फार पूर्वी लांब मान असलेल्या एका मोठ्या प्राण्याचे हे लोक वंशज आहेत. तेव्हा वन्य प्राण्यांपासून रक्षण करण्यासाठी या स्त्रिया तांब्याच्या कड्या घालतात. या कड्या आता प्रतिष्ठेच्या झाल्या आहेत आणि एक दागिना म्हणूनही त्या घातल्या जात आहेत. पण या स्त्रियांसाठी मात्र या कड्या म्हणजे एक प्रकारची

वेठबिगारीच झाली आहे. याची कारणेही आहेत. मूळचे हे लोक म्यानमारचे असले तरी खूप वर्षांपूवी उपजीविकेसाठी ते थायलंडमध्ये आले. पण खेड्यांमध्ये, या जमातीपर्यंत मूलभूत शिक्षण पोचलेले नाही व त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या नाहीत. ही जमात तशी आळशीही आहे.

पाडुंग पुरूषांना पर्यटनाशी संबंधितही नोकऱ्या मिळविता आल्या नाहीत. पण आपल्या जमातीतील स्त्रियांची लांब झालेली मान ही पर्यटकांना आकर्षित करते व ही पद्धत आपल्याला काही पैसे मिळ्वून देऊ शकते, हे मात्र त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे स्त्रियांनी या कड्या घालाव्यात यासाठी त्यांच्यावर या पुरूषांनी दबाव आणला. या खेड्यांमध्ये पोचण्यासाठी नावेतून थोडासा प्रवास करावा लागतो. त्यामुळे या गावात पोचविणारा नावाडी हाच पर्यटकांचा 'गाईड' असतो. या खेड्यांपर्यंत पोचविण्यासाठी या नावाड्याला ५०० बाथ म्हणजे एक अमेरिकन डॉलर द्यावा लागतो. या जमातींच्या कॅम्पपर्यंत पोचण्याचे मार्ग या मार्गदर्शक नावाडयांना किंवा पर्यटक कंपन्यांनाच माहिती असतात. हे नावाडी एका स्त्रीला आपली लांब मान दाखविण्याचे दरमहा ५०० बाथ देतात. पैसे मिळविण्याचा हा घरबसला मार्ग काही प्रमाणात स्त्रिया स्वखुशीने तर कधी जबरदस्तीने मान्य करतात. ही परंपरा चालत आल्याने काही स्त्रियांना त्यात काही गैर वाटत नाही आणि त्या आपल्या अगदी पाच-सहा वर्षांच्या मुलींच्याही मानेभोवती कड्या घालतात. या लहान मुलींना प्रथम एक किलो वजनाची कडी घालतात. तिचे वय आठ-नऊ वर्षे झाले की मग दुसरी कडी व बारा-तेरा वय झाले की तिसरी कडी घालतात. ज्या मुलींना हे वजन सहज पेलवते तिच्या मानेत अगदी पाच किलो वजनाच्या सुद्धा कड्या घालण्यात येतात. काहींना याचा त्रास होतो. कधी कधी झोपही नीट लागत नाही. पण उपजीविकेच्या या मार्गापासून त्यांची सुटका नाही. एखादी लहानगी खूप कंटाळली तर, माय-लेकी दोघीच्च घरात असताना या चिमुरडीची काही काळ तरी या कड्यांपासून सुटका होते. काही स्त्रियांच्या मते हे करणे बंधनकारक नाही. मुली तरूण झाल्यानंतर त्यांनी हा निर्णय स्वेच्छेने घ्यायचा असतो. पण मुलींनी हे केले तर त्या कुटुंबाचे भविष्य आर्थिकदृष्ट्या सुरक्षित समजले जाते. तेव्हा मुली नाही तरी कशा म्हणत असतील ? काही स्त्रियांना मात्र आपल्या मुलींना नवशिक्षण देण्याची व या त्रासातून बाहेर काढण्याची इच्छा आहे. काही पर्यटकही मानवाधिकारांचा उल्लेख करून या स्त्रियांचा त्रास दूर केला पाहिजे, असे म्हणतात. पण अजूनतरी यावर उत्तर सापडलेले नाही. *(संदर्भ - इंटरनेट )* ■■

# कालप्रवाहात.....

## डाकिया डाक लाया, डाक लाया.......

डाकिया चित्रपटातील राजेश खन्नाने साकारलेली पोस्टमनची भूमिका भारतात खेड्यापाड्यांमध्ये लोकप्रिय झालेल्या पोस्टमनचे व पोस्टसेवेचे यथार्थ दर्शन घडविते. गेल्या पन्नास वर्षांमध्ये, भारतातील पोस्टखात्याने अगदी दूरदूरच्या खेड्यांमध्ये आपली सेवा रूजू केली आहे. भारतात पोस्टखात्याची सुमारे दीड लाख कार्यालये असून त्यातील ९० टक्के ग्रामीण भागात आहेत. पोस्टसेवा सर्वदूर पोचविण्यात, आशियातील देशांमध्ये भारताचा प्रथम क्रमांक आहे. चीनलाही भारताने मागे टाकले आहे. २००१ मधील या आकडेवारीवरून हे स्पष्ट होईल. (आकडेवारी हजारात आहे)

| देश | कार्यालयांची संख्या | एका कार्यालयामागील नागरिकाची संख्या |
|---|---|---|
| भारत | १५४.९ | ६.६ |
| चीन | ५७.१ | २२.५ |
| इंडोनेशिया | १९.९ | १०.८ |
| कोरिया | ३.७ | १२.८ |
| फिलिपिन्स | २.९ | २६.६ |
| मलेशिया | १.२ | १८.५ |
| सिंगापूर | ०.२ | २६.० |

*(संदर्भ - फ्रॉस्ट अँड सलिव्हान- इकॉनॉमिक टाइम्स)* ■■

## दूरसंचारक्षेत्रात भारत मागे

दूरसंचार क्षेत्रात भारताला अजून बरीच मोठी प्रगती गाठायची आहे. या क्षेत्रावरील भारताचा खर्च जपानच्या खर्चाच्या तुलनेत एक तृतीयांश आहे; तर चीनच्या खर्चाच्या तुलनेत तो निम्मा आहे. याचा अर्थ भारतातील या क्षेत्राला चांगले दिवस येणार आहेत. नजीकच्या भविष्यात भारतातील यासंबंधीची गुंतवणूक वाढण्याचा अंदाज आहे.

*(संदर्भ - इकॉनॉमिक टाइम्स)* ■■

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECON
LIBRARY

# अर्थबोधपत्रिका चौकस गट

**अर्थबोधपत्रिकेच्या वाचकांमध्ये तरूण विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे; आणि ती तशी वाढावी** असा या मासिकाचा प्रयत्नही आहे. नव्याने पसरू पाहत असलेल्या ज्ञानयुगात, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या औपचारिक शिक्षणाच्या कक्षांबाहेर पडून व्यापक ज्ञानमय जगाची अधिक ओळख करून घेतली पाहिजे, अशी गरज तीव्रतेने निर्माण झाली आहे.

बौद्धिकतेच्या क्षेत्रात उतरण्याचे अर्थबोधपत्रिका हे एक साधन आहे.

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांचा प्रयत्न असा आहे की, पदव्युत्तर किंवा पदवी पातळीवरील महाविद्यालयीन विद्यार्थी, त्यांची व्यापक ज्ञानक्षेत्रातील प्रवेशाची गरज आणि अर्थबोधपत्रिका हे मासिक या तिन्हींची सांगड घालावी. ज्ञानार्थी विद्यार्थ्यांचा एक चौकस गट त्यातून निर्माण व्हावा.


प्रा. दाभोळकर यांच्या सहकार्याने एक योजनाच आखली गेली आहे.

## <u>चौकस गट</u>

• जे पदवी-पदव्युत्तर विद्यार्थी १ जानेवारी २००४ पर्यंत अर्थबोधपत्रिकेचे सभासद होतील त्यांना, १०० रुपये वर्गणीत, एक वर्षाऐवजी दोन वर्षांचे सभासदत्व मिळेल. •या विद्यार्थ्यांना भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या ग्रंथालयाचा लाभ, विनाशुल्क घेता येईल. • अर्थबोधपत्रिकेच्या या विद्यार्थी-सभासदांचा एक चौकस गट स्थापन केला जाईल. • या चौकस गटाच्या बौद्धिक स्वरूपाच्या मासिक सभा या संस्थेच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित केल्या जातील. याच्या पहिल्या सभेस स्वत: प्रा. दाभोळकर विद्यार्थ्यांबरोबर चर्चेसाठी हजर असतील. • चौकस गटाचे नेतृत्व आणि कार्यक्रमांचे सर्व संयोजन गटाच्या सदस्यांकडे पहिल्या सभेत सुपूर्त केले जाईल.

**<u>संपर्कासाठी</u>** : (१) भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, अर्थबोध, ९६८- २१/२२,सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६,

(२) डॉ. के. एन्. बवले, प्राचार्य, आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे- ४१० ५०४




'अर्थबोधपत्रिके'चा हा जोडअंक, 'आशियातील शेजारी राष्ट्रे' या विषयावरील विशेषांक असल्याने आशियातील विविध देशांचे भौगोलिक स्थान ध्यानात यावे, यासाठी हा नकाशा देण्यात आला आहे. *(संदर्भ - स्टेट्समन इयर बुक २००३)*

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

•अजित कर्णिक •विकासचंद्र चित्रे •मृणाल दत्तचौधरी •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •के. एन्. राज •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**